बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र राज्य

Developed By:

महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१



# मनोधैर्य योजनेंतर्गत

## पीडितांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी संदर्भ पुस्तिका

An Initiative Of:

Supported By:

(ही प्रत बाल हक्क संरक्षण आयोग आयोजित कार्यक्रमासाठी छापण्यात आलेली आहे)

# दोन शब्द



प्रिय महाराष्ट्र वासियांनो,

सर्वप्रथम आपल्या सर्वांना महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या वतीने मन:पूर्वक शुभेच्छा.

बालकांच्या हक्कासंदर्भात भारतीय संविधान आणि संयुक्त राष्ट्र संघाने निहित केलेल्या बालहक्काशी राज्यातील सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम आणि शासकीय, निमशासकीय पातळीवरील प्रशासकीय बाबी या सुसंगत असाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग नेहमीच कटिबद्ध व प्रयत्नशील आहे.

स्वप्न बालस्नेही महाराष्ट्राचे व बाल मतांच्या सन्मानाचे हे ध्येय घेऊन राज्यात बालकांसाठी अनुकूल अशी यंत्रणा पोलिस व प्रशासनामार्फत स्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या प्रयत्नाचाच भाग म्हणून विविध शासकीय योजना, कायदे कानून याबाबत माहितीपुस्तिका नेहमीच उपयोगी ठरते. म्हणूनच या पुस्तिकेच्या माध्यमातून शासनाच्या मनोधैर्य योजनेबाबतची सखोल व सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

बालकांबरोबर होत असलेली सामाजिक दुष्कृत्य, घरगुती हिंसाचार, तस्करी, गैरवर्तन, छळ - शोषण, लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हे, बाल- वेश्या व्यवसाय, बालविवाह, बालमजुरी अश्या असंख्य बाबींमुळे बालकांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ बाधित होते. समाजात बालकांच्या बाबतीत अश्या वाईट गोष्टी घडत असताना पीडीत बालकास आधार वाटावा, त्यांची कोणीतरी मनापासून काळजी घेणारं आहे असा विश्वास व आपुलकी निर्माण व्हावी यासाठी कायम उपाययोजना करणे गरजेचे आहे. लैंगिक शोषणामुळे पीडीत बालके व स्त्रिया शारीरिक आणि मानसिक दृष्टीने पार खचून जातात. समाजातील विकृती संपवणे हे आपले सर्वांचे उद्दिष्ट आहेच, परंतु जे अश्या लैंगिक अत्याचारास बळी पडतात अश्या असहाय पीडीतांना शासन स्तरावर मदत मिळणे गरजेचे आहे. पोक्सो कायद्यानुसार नोंदणी झालेल्या गुन्हे, ॲसिड हल्ल्यातील पीडीत आदी अश्या बाबींमध्ये मनोधैर्य योजनेमार्फत पीडीतास मानसिक व शारीरिक दृष्टया सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव अर्थसहाय्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येते.

मला खात्री वाटते की या माहितीपुस्तिकेच्या माध्यमातून बालहक्क क्षेत्रात काम करणाऱ्या विविध यंत्रणांना नक्कीच उपयोगी अशी माहिती मिळेल. बालकांच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करत असताना पीडीत बालकांना उचित लाभ मिळवून देणे हे देखील आपले कर्तव्य आहे. त्यादृष्टीने ही पुस्तिका मार्गदर्शक ठरेल. तसेच आयोगाची अध्यक्षा या नात्याने, मी व्यक्तिशः समाजातील सर्व स्तरांना आमच्या आयोगाच्या विविध मोहिमांमध्ये देखील सामील होण्याचे आवाहन करते.

चला तर मग बालरक्षक होऊयात व एकत्र येऊन बालस्नेही महाराष्ट्र घडवूयात.

**धन्यवाद,**
**सुसीबेन शाह,**
**अध्यक्षा**
**महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग**


---

**आपले विनीत**
**महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य**

**मा. ॲड. निलिमा चव्हाण, मा. ॲड. संजय सेंगर, मा. ॲड. प्रज्ञा खोसरे, मा. ॲड. जयश्री पालवे, मा. सायली पालखेडकर, मा. चैतन्य पुरंदरे**

**Website :**
**https://english.mscpcr.org/**

# दोन शब्द



पीडित व्यक्तीबाबत घडलेल्या गुन्ह्याचा अतिशय हानिकारक परिणाम तिच्या मानसिक आरोग्यावर आणि भावनिक सुरक्षिततेवर होऊ शकतो. लैंगिक अत्याचार आणि शोषणामुळे पीडित व्यक्तीला केवळ शारीरिक हिंसाच अनुभवावी लागते असे नाही, तर अशी व्यक्ती भावनिकदृष्ट्या कायमची दुखावली जाऊन मानसिकदृष्ट्याही कोलमडून जाते. अशा पीडित व्यक्तीच्या शारीरिक जखमा भरून निघतीलही, परंतु मनावरच्या जखमा वर्षानुवर्षे खोलवर रुजलेल्या राहू शकतात.

लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांची माहिती देणे आणि तक्रार नोंदविणे देखील पीडित व्यक्ती आणि तिच्या कुटुंबियांसाठी सोपे नसते. आजूबाजूचे प्रतिकूल वातावरण, बदनामीची भीती किंवा पीडितेलाच दोषी ठरविण्याची सामाजिक प्रवृत्ती यामुळे अशा गुन्ह्यांतील पीडित आणि तिचे कुटुंबीय न्यायासाठी पुढे येणे टाळतात.

कायदे मंडळ आणि न्यायपालिकांनी लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास आणि खटले चालविण्याची प्रक्रिया पीडितांना सहाय्यक होईल अशी करण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत झालेले कायदे आणि निकालांतून ही बाब दिसून येते. बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण करणारा 2012 चा कायदा आणि 2013 मधील 'निर्भया प्रकरणा' नंतर गुन्हेगारी कायद्यात झालेली सुधारणा ही त्याचीच उदाहरणे आहेत.

न्याय व्यवस्था पीडितेच्या पाठीशी राहाणे जसे अत्यंत महत्त्वाचे आहे, तसेच पीडितेच्या नुकसानभरपाईकडे देखील तितक्याच जबाबदारीने बघणे आवश्यक आहे. ही भरपाई म्हणजे तिला धर्मादाय दिली जाणारी मदत नसून, तिचा तो हक्क आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पीडितांना नुकसान भरपाई देण्यासाठी 30 डिसेंबर 2017 रोजी लागू झालेली 'मनोधैर्य योजना' ही अशीच एक योजना आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (MSLSA आणि DLSA) सन 2018 पासून 'मनोधैर्य योजना' राबवत असून लैंगिक शोषणाला बळी पडलेल्यांना भरपाई देत आहेत. या 'मनोधैर्य पीडित भरपाई योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य विधी सेवा प्राधिकरणाने दि. 22 फेब्रुवारी 2018 रोजी एक अधिसूचना (क्रमांक MSLSA/2018/445) काढून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. तेव्हापासून बलात्कार आणि लैंगिक अत्याचार पीडित बालकांचे सक्षम पुनर्वसन करण्याबरोबरच त्यांना या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य प्रदान केले जात आहे. 'मनोधैर्य योजनें'तर्गत पीडितांना मिळणाऱ्या या भरपाईबाबत विविध पैलू स्पष्ट करण्यासाठी 'विप्ला फाउंडेशन' आणि DWCD (महिला व बाल विकास विभाग) यांनी मिळून ही माहिती पुस्तिका तयार केली आहे. पीडितांना नुकसान भरपाई मिळवून देण्यात आणि त्यांचे पुनर्वसन सुनिश्चित करण्यात विविध घटकांच्या काय भूमिका आहेत हे देखील या पुस्तिकेतून समजते.

'मनोधैर्य योजने'शी संबंधित मुद्दे आणि विविध घटकांच्या भूमिका याबद्दल 'रेडी रेकनर' म्हणून वापरता येईल अशी ही अभ्यासपूर्ण संदर्भ पुस्तिका 'विप्ला फाऊंडेशन'ने प्रयत्नपूर्वक सादर केली आहे, याबद्दल महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण (MSLSA) 'विप्ला फाऊंडेशन'चे अभिनंदन करत आहे.

**कार्यकारी अध्यक्ष,**
**माननीय न्यायमूर्ती श्री. संजय व्ही. गंगापूरवाला**
**दि. ०९/ १२/ २०२२**

# दोन शब्द



अलीकडच्या काही वर्षांत देशात सगळीकडेच महिलांबाबत घडणारे गुन्हे नोंदले जात आहेत. एकीकडे समाजातील काही घटक महिलांचे हक्क आणि लैंगिक समानतेचा पुरस्कार करत आहेत, तर दुसरीकडे महिलांना समाजातील गुन्हेगारांपासून वाचवण्यासाठी अधिक चांगल्या संरक्षणाची गरज अधोरेखित केली जात आहे.


लिंग आधारित अत्याचारांचे सर्वात गंभीर स्वरूप म्हणजे स्त्रिया आणि बालकांविरुद्ध होणारी लैंगिक गुन्हेगारी. कारण अशा गुन्ह्यांमुळे केवळ त्यांच्या शारीरिक आणि लैंगिक खासगीपणावर आक्रमण होते असे नाही, तर त्यांची मानसिक स्थितीही दीर्घकाळासाठी बिघडते. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने 'मनोधैर्य योजना' तयार केली असून, 30 डिसेंबर 2017 च्या शासन निर्णयानुसार ती अमलात आणली आहे. ही योजना बलात्कार, POCSO (लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा) अंतर्गत गुन्हे आणि ॲसिड हल्ल्यातील पीडितांना आर्थिक सहाय्य देऊन आयुष्यात त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी उपयुक्त आहे. ही योजना महाराष्ट्रात राज्य आणि जिल्हा स्तरावरील विधी सेवा प्राधिकरणांमार्फत राबविण्यात येते.

या योजनेअंतर्गत पीडितांना त्यांच्या जीवनात पुन्हा सक्षम करण्यासाठी १ लाख रुपयांपासून ते विशेष प्रकरणांत 10 लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. पीडित आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे पुनर्वसन करताना त्यांना आवश्यकतेनुसार निवारा, समुपदेशन, वैद्यकीय आणि कायदेशीर सहाय्य, शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण देखील दिले जाते. पीडितांना त्यांचे जीवन सन्मानाने आणि स्वावलंबी जगता यावे यासाठी सरकार त्यांना आवश्यक ती सर्व मदत मनोधैर्य योजनेद्वारे पुरवते.

'मनोधैर्य योजना' आणि त्याच्याशी संबंधित विविध सहभागींच्या भूमिका यांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण विप्ला फाउंडेशनने केले आहे. त्यांचे हे प्रयत्न कौतुकास्पद आहेत असे महिला आणि बाल विकास विभाग आयुक्तालयाला वाटते. मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसान भरपाईशी संबंधित सर्व मुद्द्यांवर ही संदर्भ पुस्तिका उपयुक्त ठरेल.

**आर. विमला** (I.A.S.)
**आयुक्त,**
**महिला आणि बालविकास**
**महाराष्ट्र राज्य**

# प्रस्तावना



समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या विविध घटकांच्या साखळीचा एक भाग होऊन आम्ही जबाबदारीने आमचे कर्तव्यपालन करत आहोत. ज्या व्यक्ती आणि गटांना सोबत घेऊन आम्ही काम करतो, त्यांच्या हिताचे आणि अधिकारांचे रक्षण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करणे ही सुद्धा आमची जबाबदारी आहे. आपल्या भारतीय राज्यघटनेत सांगितलेली तत्त्वे आणि मूल्ये प्रत्यक्ष आचरणात आणली जावीत यासाठी आपणच पाऊल उचलले पाहिजे अन्यथा आपली उदात्त आणि आदर्श राज्यघटना, कायदे, धोरणे, योजना हे सर्व केवळ कागदावरच राहील. प्रत्येकाला सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी, विशेषतः जे असुरक्षित आणि पीडित-शोषित आहेत त्यांच्यासाठी असे करणे अत्यंत आवश्यक आहे.

अवैध मानवी वाहतूक, हिंसा आणि लैंगिक शोषणाविरुद्ध सरकार करत असलेल्या प्रयत्नांना बळ देण्यासाठी 'विप्ला फाउंडेशन' गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून सरकारच्या उपक्रमांत सहभागी होत आले आहे. न्यायव्यवस्था, कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे अधिकारी आणि पीडित व्यक्ती यांच्या सोबत राहून 'विप्ला फाउंडेशन' काम करत आहे.

लैंगिक शोषणाला बळी पडलेल्यांना भरपाई देण्यासाठी महाराष्ट्रात दोन योजना आहेत. एक म्हणजे 'महाराष्ट्र पीडित नुकसान भरपाई योजना' आणि दुसरी 'मनोधैर्य योजना'. या योजना पीडित व्यक्तीला हरप्रकारे न्याय मिळवून देण्यासाठी तर आहेतच, त्याही पुढे जाऊन पीडित व्यक्तीचे योग्य पुनर्वसन करण्यासाठी देखील या योजना खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र पीडितांना या योजनांचा लाभ मिळवून देताना पार पाडाव्या लागणाऱ्या प्रक्रियेतील अडचणी किंवा पीडित व्यक्तीचे अज्ञान यामुळे अनेकदा हे काम आव्हानात्मक ठरते.

'मनोधैर्य योजने'अंतर्गत नुकसान भरपाई कशी मिळवून देता येते याची तपशीलवार माहिती या पुस्तिकेतून देण्याचा प्रयत्न 'विप्ला फाऊंडेशन'ने केला आहे. त्याचा उपयोग कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी, पीडित आणि इतर संबंधितांना होईल. या माहिती पुस्तिकेतील 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' हा विभाग 'विप्ला फाउंडेशन'च्या सर्व कार्यकर्त्यांनी मिळून लिहिला आहे. कारण प्रत्यक्ष काम करताना समोर येणारा प्रत्येक संभाव्य प्रश्न आणि येऊ शकणाऱ्या व्यावहारिक अडचणींचे स्पष्टीकरण व उत्तर मिळणे अतिशय गरजेचे आहे.

पीडितांना 'मनोधैर्य योजने'चा लाभ मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी या माहिती पुस्तिकेची नक्कीच मदत होईल आणि त्यासाठी ही पुस्तिका मोठ्या प्रमाणात वापरली जाईल अशी आशा आहे.

**प्रमोद निगुडकर**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**विप्ला फाऊंडेशन**

# अनुक्रमणिका


| विषय | पान क्रमांक |
|---|---|
| 1 परिचय | 07 |
| 2 पीडितांना नुकसान भरपाई | 08 |
| 3 पीडितांना भरपाईबाबत सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे | 08 |
| 4 मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाई | 09 |
| 5 गुन्ह्यातील दुखापतीबाबत मदत आणि पुनर्वसनासाठी जिल्हा मंडळ | 09 |
| 6 मनोधैर्य योजनेअंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र व्यक्ती | 10 |
| 7 नुकसान भरपाई / आर्थिक सहाय्याचे प्रमाण | 11 |
| 8 मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईचा दावा करण्याची प्रक्रिया | 13 |
| 9 मनोधैर्य योजनेत भरपाई देताना इतर सहभागींच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या | 14 |
| 10 नुकसान भरपाईचे वितरण | 20 |
| 11 वारंवार विचारले जाणारे प्रश्न | 22 |
| 12 पीडितांना भरपाई देणाऱ्या इतर योजना / कायदे | 30 |
| परिशिष्ट I | 32 |
| परिशिष्ट II | 41 |
| परिशिष्ट III | 42 |

# संक्षिप्त रूपे

| | | |
|---|---|---|
| CNCP | - | Child in Need of Care and Protection (काळजी आणि संरक्षणाची गरज असलेले बालक) |
| Cr.PC | - | Code of Criminal Procedure (फौजदारी दंड संहिता) |
| CWC | - | Child Welfare Committee (बाल कल्याण समिती) |
| CWO | - | Child Welfare Officer (बाल कल्याण अधिकारी) |
| DCPU | - | District Child Protection Unit (जिल्हा बाल संरक्षण कक्ष) |
| DLSA | - | District Legal Services Authority (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) |
| ITPA | - | Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा, 1956) |
| IO | - | Investigation Officer (तपास अधिकारी) |
| IPC | - | Indian Penal Code (45 of 1860) (भारतीय दंड संहिता (1860 चे कलम 45) |
| JJ Act | - | The Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 (बाल न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015) |
| JJ Rules | - | The Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015-Rules (बाल न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 चे नियम) |
| MSLSA | - | Maharashtra State Legal Services Authority (महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण) |
| NALSA | - | National Legal Service Authority (राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण) |
| NGO | - | Non-Government Organization (बिगर सरकारी संस्था) |
| PDJ | - | Principal District Judge (प्रमुख जिल्हा न्यायाधीश) |
| PLV | - | Para Legal Volunteer (विधीविषयक मदतनीस) |
| PO | - | Probation Officer (परिविक्षा अधिकारी) |
| POCSO | - | Protection of Children from Sexual Offences Act, 2012 (लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा, 2012) |
| SLSA | - | State Legal Services Authority (राज्य विधी सेवा प्राधिकरण) |
| FGD | - | Focussed Group Discussion (लक्षकेंद्रित गट चर्चा) |
| FIR | - | First Information Report (प्राथमिक माहिती अहवाल) |
| SMS | - | Short Message Service (लघु संदेश सेवा) |
| SJPU | - | Special Juvenile Police Unit (बालकांसाठी विशेष पोलिस कक्ष) |

# 01 परिचय

पीडितांची सेवा आणि पुनर्वसन या विषयात पीडितांना दिली जाणारी भरपाई हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक हिंसाचाराला बळी पडलेले पीडित साधारणतः आपले कुटुंब, मित्र आणि समुदायापासून वेगळे पडतात. शरीर-मनावरील आघातामुळे त्यांच्यात आत्मविश्वासाचा आणि स्वाभिमानाचा अभाव असतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे ते सामाजिक, भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या असुरक्षित झालेले असतात आणि त्यांना पुन्हा त्याच प्रकारच्या शोषणाला बळी पडावे लागू नये यासाठी तातडीने आधार देण्याची गरज असते. नुकसान भरपाई आणि त्यासंबंधी इतर मदतीमुळे पीडितांना जगण्याची एक नवी हमी मिळते असे म्हणता येईल. आपल्यावर अन्याय करणाऱ्या गुन्हेगाराला पकडले गेले नसले किंवा त्याच्यावर कारवाई झालेली नसली, तरीही या मदतीमुळे आपल्या बाजूने कुणीतरी आहे आहे आणि आपल्याला एकप्रकारे मध्यवर्ती न्यायच मिळत आहे असे पीडितांना वाटू शकते. नुकसान भरपाई योग्य वेळेत मिळवून देणे हा पीडितांना सक्षम करण्याच्या प्रक्रियेचाच भाग असतो.

बलात्कार आणि ॲसिड हल्ल्यातील पीडितांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे मनोधैर्य योजना राबविली जात आहे. अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायदा, 1956 अंतर्गत सुटका करण्यात आलेल्या 18 वर्षांपेक्षा कमी वयाच्या पीडितांसाठीही ही योजना लागू करण्यात आली आहे.

विप्ला फाउंडेशन गेल्या दोन दशकांपासून अनैतिक मानवी वाहतुकीतील पीडितांना न्याय मिळवून देऊन त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सक्षम करण्यासाठी कार्यरत आहे. या पीडितांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी फाउंडेशनने महाराष्ट्र राज्यात पीडित आणि संबंधित व्यवस्थेसोबत काम केले आहे. नुकसान भरपाई योजना अनैतिक मानवी वाहतुकीच्या पीडितांनाही लागू व्हावी यासाठी संस्थेने पाठपुरावा केला. राज्य सरकारने या पीडितांचा भरपाई योजनेत समावेश करेपर्यंत फाउंडेशनने राज्याच्या अनेक जिल्ह्यांतील पीडितांची बाजू सातत्याने मांडली. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी आणि आव्हानेही लक्षात आली आणि त्यावर मात करण्याचे संभाव्य मार्गही शोधता आले. नुकसान भरपाई मिळाल्याने पीडितांच्या केवळ पुनर्वसनालाच मदत होते असे नाही, तर त्यांच्यात सक्षमतेची तीव्र भावना निर्माण होते आणि सरकारही आपल्या पाठीशी असल्याचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचतो.

ही पुस्तिका पीडितांना भरपाई देणाऱ्या मनोधैर्य योजनेची सखोल माहिती देण्याच्या हेतूने तयार केली असून सुलभपणे नुकसानभरपाई मिळविण्यासाठी एक संदर्भ पुस्तिका म्हणून वापरता येईल. भरपाई प्रक्रियेतील विलंब, गुंतागुंत किंवा संदिग्धता आणि गैरसमज दूर व्हावेत अशा रीतीने या पुस्तिकेची आखणी केली असल्याने पीडितांना भरपाई देण्याची संपूर्ण प्रक्रिया सन्मानपूर्वक होऊ शकेल.

विप्ला फाउंडेशनला ही पुस्तिका तयार करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण (MSLSA) आणि महिला आणि बाल विकास विभागाचे आभारी आहे. आम्ही MSLSA कार्यालयाचे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवांचे आभार मानतो. त्यांनी पीडितांना भरपाई मिळवून देण्याबाबत सामान्य प्रश्नांची आणि परिस्थितीची उत्तरे शोधण्यात संस्थेला मदत केली आहे आणि ते या पुस्तिकेचे वैशिष्ट्य आहे. विप्ला फाउंडेशन बाल कल्याण समितीचे (CWC) प्रतिनिधी आणि संरक्षणगृह कर्मचाऱ्यांचेही आभार मानते. त्यांनी त्यांचे प्रत्यक्ष अनुभव सांगितले आणि पीडितांना भरपाई देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी त्यात सूत्रबद्धता आणण्याची गरज व्यक्त केली. अखेरीस ज्यांचा उल्लेख करावाच लागेल ते म्हणजे, लैंगिक हिंसाचारातून बाहेर पडलेल्या ज्या पीडितांना जीवनात पुन्हा उभारी घेण्यासाठी नुकसानभरपाईमुळे मदत झाली, त्यांनी त्यांचे अनुभवकथन केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

## 02 पीडितांना नुकसान भरपाई

फौजदारी न्याय व्यवस्थेमध्ये गुन्ह्यातील पीडिताला विशेष महत्त्व असते. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 21 अंतर्गत व्यक्तींचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य राखणे आणि त्यांचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. विधी आयोगाने 1996 मध्ये आपल्या 154 व्या अहवालाद्वारे, पीडित व्यक्तीला त्वरित आधार व संरक्षण देण्यासाठी मान्यताप्राप्त पद्धत म्हणून नुकसान भरपाईचा प्रस्ताव दिला होता. तसेच, काही घटनांमध्ये ही भरपाई पीडितेच्या कुटुंबाला देखील देण्याची शिफारस केली होती.

मलिमठ समितीने 2003 मध्ये हेही अधोरेखित केले की, गुन्हेगार पकडला जातो की नाही, दोषी ठरतो की निर्दोष सुटतो हे महत्वाचे नसून, पीडित व्यक्तीला भरपाई देणे जास्त महत्वाचे आहे आणि ते सरकारला बंधनकारक आहे.

केवळ गुन्हेगाराला कायद्यानुसार शिक्षा दिली म्हणजे त्या गुन्ह्यातील पीडितेला पूर्ण न्याय मिळाला असे होत नाही. गुन्ह्याला बळी पडल्यानंतर त्या पीडितेच्या आयुष्यात अनेक सामाजिक-आर्थिक समस्या निर्माण होतात. अशावेळी पीडित व्यक्तीच्या जीवाचे, स्वातंत्र्याचे आणि प्रतिष्ठेचे रक्षण करणे याचे घटनात्मक बंधन सरकारवर आहे. ही जबाबदारी फक्त सरकारची नसून, यंत्रणेत काम करणारे लोकही त्या योजनांची सार्थ अंमलबजावणी करण्यास तितकेच जबाबदार आहेत.

## 03 पीडितांना भरपाईबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील ***सरकार विरुद्ध गुजरात उच्च न्यायालय,*** *AIR 1998 SC 364* या खटल्यात नुकसानभरपाईचे महत्त्व पुन्हा पुन्हा नोंदविले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे की, “भरपाईविना दिलेला फौजदारी न्याय पोकळ असेल”.

***टेकन उर्फ टेकराम विरुद्ध मध्य प्रदेश सरकार (आता छत्तीसगड), फौजदारी अपील क्र. 2015 च्या 884 (सर्वोच्च न्यायालय)*** या खटल्यात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले आहे की - केवळ नुकसानभरपाईची रक्कमच नव्हे, तर तिच्या वाटपाची पद्धत देखील पीडितांच्या गरजेनुसार ठरविली जाणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्रात पीडितांना नुकसान भरपाई देणाऱ्या दोन योजना आहेत-**
a) महाराष्ट्र पीडित नुकसानभरपाई योजना आणि
b) मनोधैर्य योजना

महाराष्ट्र पीडित नुकसानभरपाई योजनेंतर्गत दिली जाणारी भरपाई जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे (DLSA) **न्यायालयाच्या शिफारशीनुसार** मंजूर केली जाते. **‘मनोधैर्य योजने’अंतर्गत भरपाईसाठी न्यायालयाच्या कोणत्याही शिफारसीची गरज नसते.** यापूर्वी लैंगिक शोषणाच्या पीडितांना ‘महाराष्ट्र पीडित भरपाई योजनें’तर्गत संरक्षण दिले जात नव्हते, आता तेही यात समाविष्ट केले गेले आहेत. त्यांना नुकसानभरपाई देण्याची शिफारस न्यायालय खटल्याच्या सुनावणीपूर्वी किंवा नंतरही करू शकते.

ही पुस्तिका या विषयातील सर्व संबंधितांसाठी उपयुक्त आहे. मनोधैर्य योजना आणि या योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळविण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी एक संदर्भ पुस्तिका म्हणून तिचा उपयोग होऊ शकतो.

# 04 मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाई

माननीय सर्वोच्च न्यायालयाने[1] या खटल्यात जारी केलेल्या निर्देशांचे पालन करून महाराष्ट्र सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागाने (DWCD) 2 ऑक्टोबर 2013 रोजी 'मनोधैर्य योजना' सुरू केली. या योजनेद्वारे महाराष्ट्र राज्यात बलात्कार, POCSO अंतर्गत लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यातील पीडितांना आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते. DWCD द्वारे लागू करण्यात आलेली ही योजना आता 30 डिसेंबर 2017 च्या शासन निर्णय क्र. संकीर्ण–2017/प्र.क्र.255/का–2 नुसार महाराष्ट्र राज्य विधी सेवा आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांमार्फत (MSLSA/DLSA) लागू केली जात आहे. या योजनेंतर्गत पीडितांना गुन्ह्याच्या प्रकारानुसार योग्य तेवढी आर्थिक मदत आणि पुनर्वसनासाठी सहाय्य मिळण्याचा अधिकार आहे. डिसेंबर 2017 च्या शासन निर्णयानुसार मनोधैर्य योजना आणि तिची अंमलबजावणी होत असल्याने या संदर्भातील आधीचे सर्व ठराव रद्द मानले जातील.

मनोधैर्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य विधी सेवा प्राधिकरणाने (MSLSA) दिनांक 22 फेब्रुवारी 2018 रोजी एक अधिसूचना क्र.MSLSA/2018/445 जारी करून मनोधैर्य पीडित नुकसान भरपाई योजना (जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे) तयार केली आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे या पुस्तिकेमध्ये असून ती परिशिष्ट -I मध्ये नोंदविलेली आहेत. मनोधैर्य योजना आणि MSLSA ची मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास मनोधैर्य योजनेचा 30 डिसेंबर 2017 शासन निर्णय हाच अधिकृत समजला जाईल.

# 05 गुन्ह्यातील दुखापतींबाबत मदत आणि पुनर्वसनासाठी जिल्हा मंडळ

मनोधैर्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी 'गुन्ह्यातील दुखापतींबाबत मदत आणि पुनर्वसनासाठी एक जिल्हास्तरीय मंडळ' (यापुढे 'जिल्हा मंडळ' असा उल्लेख असेल) स्थापन केले जाते. हे मंडळ नुकसान भरपाईसाठी आलेल्या अर्जांचे मूल्यांकन करते. त्या जिल्ह्यात मनोधैर्य योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करण्याचे सर्व विशेषाधिकार जिल्हा मंडळाकडे असतात.

### 5.1 जिल्हा मंडळाचे सदस्य पुढीलप्रमाणे असतात:

01 मुख्य जिल्हा न्यायाधीश (PDJ)/जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष जे जिल्हा मंडळाचे अध्यक्ष असतात.

02 पोलिस अधीक्षक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी.

03 महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील अनुभव असलेली एक महिला, जी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या (DLSA) अध्यक्षांनी एका वेळी एक वर्षाच्या कालावधीसाठी नामनिर्देशित केलेली असते.

04 जिल्हा शल्यचिकित्सक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी अथवा जिल्हा आरोग्य आणि कुटुंब कल्याण अधिकारी/जिल्हा वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी.

05 जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, जे जिल्हा मंडळाचे सदस्य सचिव असतील. त्यांनाच आर्थिक व्यवहाराचा अधिकार असेल.

[1] दिल्ली घरगुती कामगार महिला मंच विरुद्ध केंद्र सरकार - (1995) 1SCC14

### 5.2 जिल्हा मंडळाच्या जबाबदाऱ्यांवर एक नजर

a) दाव्याचा विचार करा आणि मनोधैर्य योजनेत नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आर्थिक मदत निश्चित करा.
b) पीडितांना कायदेशीर, वैद्यकीय, मानसोपचारविषयक किंवा इतर कोणत्या प्रकारे मदतीची गरज आहे याकडे लक्ष द्या.
c) बलात्कार पीडितांच्या पुनर्वसनासाठी मदत देताना राज्य किंवा केंद्र सरकारच्या इतरही योजना विचारात घ्या.
d) पीडितांना मानसोपचार, वैद्यकीय आणि कायदेशीर मदत मिळवून देण्याची व्यवस्था करा.
e) पीडितांना समुपदेशनाचे सहाय्य मिळवून द्या.
f) खटल्याचा निकाल लागेपर्यंत पीडित आणि साक्षीदारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी योग्य पावले उचला.
g) तपासाच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घ्या.
h) तरुण पीडितांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण किंवा स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी सहाय्य करा.
i) पीडितांच्या चांगल्या पुनर्वसनासाठी इतर कोणतीही योग्य मदत द्या.
j) त्या कालावधीतील परिस्थितीची गरज म्हणून पीडितांसाठी निवारागृहाची व्यवस्था करा.
k) प्रकरणातील विशेष तथ्ये आणि परिस्थिती पाहता, त्याला समर्पक आणि आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही कृती करा.

मनोधैर्य योजनेंतर्गत देय असलेले दावे आणि रक्कम वितरीत करण्याचा एकमेव अधिकार फक्त राज्य विधी सेवा प्राधिकरण (SLSA) आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) यांना आहे आणि ही प्रक्रिया एकाच प्रणालीप्रमाणे चालते.

# 06 मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाई मिळण्यास पात्र व्यक्ती

मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाई मिळण्यासाठी पुढील गुन्ह्यांतील पीडित पात्र आहेत:

1. भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम 375, 376, 376(A), 376(B), 376(C), 376(D), 376(E) अंतर्गत येणारे बलात्कार पीडित
2. बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण करणाऱ्या कायद्यांतर्गत (POCSO) येणारे पीडित. (2013 च्या POCSO कायद्यांतील कलम S.3, S.4, S.5 आणि S.6 अंतर्गत मुलगी आणि मुलालाही संरक्षण दिले आहे)
3. ॲसिड हल्ल्यातील पीडित (भारतीय दंड संहितेच्या कलम 326A आणि 326B अंतर्गत)
4. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्याअंतर्गत (ITPA) सुटका झालेले 18 वर्षांखालील पीडित.

ही योजना लागू झाल्याच्या तारखेला किंवा त्या नंतर घडलेल्या वरील प्रकारच्या गुन्ह्यातील पीडितांनाच ही योजना लागू होईल. ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नाही.

# 07 भरपाई / मदतीच्या रकमेचे प्रमाण

पोलिसांकडून एफआयआर आणि गुन्ह्याचे इतर तपशील मिळाल्यापासून किंवा नुकसान भरपाईसाठी दावा करणारा अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत पीडित व्यक्तीला तत्काळ मदत म्हणून रुपये 30,000/- दिले जातात. नंतर जिल्हा मंडळ भरपाईच्या अर्जाचे मूल्यांकन करते आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेते. त्यानुसार पीडित व्यक्तीसाठी मंजूर झालेल्या नुकसानभरपाईच्या रकमेपैकी 25% रक्कम त्वरित देण्यात येते. त्या रकमेत आधी दिलेले रुपये 30,000/- देखील मोजले जातात. उर्वरित 75% रक्कम नियमित व्याज मिळेल अशा प्रकारे राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवून तसे प्रमाणपत्र DLSA द्वारे पीडित व्यक्तीला दिले जाते; ही रक्कम बँकेत असेपर्यंत मिळणाऱ्या संपूर्ण व्याजावर पीडित व्यक्तीचाच हक्क असतो.

## 7.1 मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसान भरपाईचे प्रमाण

| क्रमांक | वर्णन | मदत रक्कम | रकमेचे वितरण |
|---|---|---|---|
| 1 | **बलात्कार पीडित** | | |
| a) | ज्या प्रकरणात पीडित महिला तिच्या शरीरावर आणि / किंवा मनावर झालेल्या अत्याचारामुळे शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या कायमची अपंग आणि / किंवा मतिमंद झाली आहे. | रु. 10 लाख पर्यंत | मंजूर रकमेपैकी 75% रक्कम 10 वर्षांच्या कालावधीसाठी पीडितेच्या बँक खात्यात मुदत ठेव म्हणून ठेवली जाईल. उर्वरित 25% रकमेचा धनादेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरणाने आदेश जारी केल्यानंतर देण्यात येईल. |
| b) | ज्या प्रकरणात महिलेवर सामूहिक बलात्कार झाला आहे आणि त्यामुळे तिला अत्यंत गंभीर स्वरूपाची शारीरिक दुखापत झाली आहे. | रु. 10 लाख पर्यंत | वर नमूद केल्याप्रमाणे |
| c) | ज्या प्रकरणात बलात्कारामुळे महिलेचा मृत्यू झाला आहे.<br>i जर मृत महिला कुटुंबातील कमावती सदस्य असेल.<br>ii जर मृत महिला कुटुंबातील कमावती सदस्य नसेल. | <br><br>रु. 10 लाख पर्यंत<br><br>रु. 10 लाख पर्यंत | वर नमूद केल्याप्रमाणे |
| d) | बलात्कार पीडित वरीलपैकी कोणत्याही प्रकारात बसत नसेल तर | रु. 3 लाख पर्यंत | वर नमूद केल्याप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | **POCSO कायद्याअंतर्गत येणारे लैंगिक अत्याचार पीडित बालक** | | |
| a) | ज्यात बालक/अल्पवयीन मुलगी कायमची मतिमंद/अपंग झाली आहे. | रु. 10 लाख पर्यंत | मंजूर रकमेपैकी 75% रक्कम 10 वर्षांच्या कालावधीसाठी पीडित बालकाच्या नावे बँक खात्यात मुदत ठेव म्हणून ठेवली जाईल. उर्वरित 25% रकमेचा धनादेश तातडीने पीडिताला देण्यात येईल. (यात वैद्यकीय उपचारांसाठीचा रु. 30,000/- चा खर्च समाविष्ट असेल) |
| b) | POCSO कायद्याअंतर्गत पीडित, पण वरील प्रकारात बसत नसेल तर | रु. 3 लाख पर्यंत | वर नमूद केल्याप्रमाणे |
| 3. | **ॲसिड हल्ला पीडित** | | |
| a) | ज्या घटनेत पीडित महिलेचा/बालकाचा चेहरा विद्रूप झाला आहे, तिच्या शरीराच्या दिसणाऱ्या भागाला इजा झाली आहे किंवा कायमचे अपंगत्व आले आहे. | रु. 10 लाख पर्यंत | मंजूर रकमेपैकी 75% रक्कम 10 वर्षांच्या कालावधीसाठी पीडितेच्या बँक खात्यात मुदत ठेव म्हणून ठेवली जाईल. उर्वरित 25% रकमेचा धनादेश तातडीने पीडिताला देण्यात येईल. (यात वैद्यकीय उपचारांसाठीचा रु. 30,000/- चा खर्च समाविष्ट असेल) |
| b) | ॲसिड हल्ला पीडित, पण वरील प्रकारात बसत नसेल तर | रु. 3 लाख पर्यंत | वर नमूद केल्याप्रमाणे |

> ***"शोषित पीडितांचे संरक्षण करण्यासाठी, विशेषतः अल्पवयीनांना राज्य पीडित नुकसान भरपाई योजनेअंतर्गत अंतरिम भरपाईसाठी आणि कायद्यानुसार त्यांच्या योग्य पुनर्वसनासाठी त्यांची शिफारस करण्याकरिता तपास यंत्रणा आवश्यक ती पावले उचलतील."***
>
> **- अज्ञात विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य सरकार** (C.R.M. 5927 of 2019)

# 08 मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईचा दावा करण्याची प्रक्रिया

## 8.1 अर्ज करण्याची प्रक्रिया

बलात्कार, ॲसिड हल्ला किंवा POCSO अंतर्गत गुन्हा पोलिस ठाण्यात नोंदवला गेल्यानंतर संबंधित तपास अधिकाऱ्याने एफआयआर दाखल झाल्यापासून एका तासाच्या आत त्याचा तपशील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या (DLSA) सचिवांना ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे किंवा संपर्काच्या कोणत्याही मार्गाने पाठवावा लागतो. या संदर्भ पुस्तिकेतील परिशिष्ट क्र. 1 मध्ये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाची (MSLSA) मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यातील अर्ज क्रमांक 1 मध्ये सांगितल्यानुसार माहिती भरून हा तपशील पाठवायचा असतो. त्यासोबत एफआयआरची प्रत / वैद्यकीय अहवाल, फौजदारी दंड संहितेच्या कलम 164 नुसार पीडितेचे स्टेटमेंट आणि प्राथमिक तपास अहवाल जोडणे आवश्यक आहे.

## 8.2 भरपाईसाठी DLSA कडे आणखी कोण संपर्क साधू शकतो?

नुकसान भरपाईसाठी कागदपत्रे पाठवण्याची प्रमुख जबाबदारी पोलिसांची आहे. तथापि, पीडितेच्या कल्याणासाठी आणि हितासाठी काम करणारी कोणतीही व्यक्ती/संस्था पीडितेला मनोधैर्य योजनेअंतर्गत नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी तिच्या वतीने संबंधित DLSA कडे एफआयआरची प्रत आणि इतर संबंधित कागदपत्रांसह अर्ज करू शकते.

यामध्ये पुढील व्यक्ती/संस्थांचा समावेश होऊ शकतो:




अर्ज करणारी व्यक्ती योजनेंतर्गत नुकसान भरपाईसाठी अर्ज करण्यासाठी मदत म्हणून **परिशिष्ट क्र.** 2 नुसार संदर्भ घेऊ शकते. जर स्वतः पीडित व्यक्ती किंवा तिच्या वतीने इतर कोणीही व्यक्ती अर्ज करण्यास असमर्थ असल्यास, DLSA कडे आलेली माहिती आणि सूचना यांनाच अर्ज मानण्यात येऊन त्यानुसार प्रक्रिया केली जाईल.

पीडितेला भावनिक आधार, मार्गदर्शन, वैद्यकीय मदत आणि मानसिक समुपदेशन मोफत देण्यासाठी जिल्हा स्तरावर महिला समुपदेशक, वैद्यकीय अधिकारी, योग्य प्रशिक्षित महिला पोलीस अधिकारी यांचा समावेश असलेले विशेष प्रशिक्षित ट्रॉमा पथक कार्यरत असते.

# 09 मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसान भरपाई सुलभ करण्यासाठी इतर संबंधितांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

9.1 मनोधैर्य योजनेनुसार भरपाईच्या प्रक्रियेची प्राथमिक जबाबदारी **पोलीस / तपास अधिकारी** यांच्यावर असून, एफआयआर आणि गुन्ह्याच्या तपशिलाची नोंद त्यांनीच DLSA कडे पाठवायची असते. तथापि, पीडित व्यक्ती स्वतः किंवा तिच्या कल्याणासाठी जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती / संस्था मदत करू शकते आणि DLSA कडे नुकसान भरपाई मिळण्याबाबत पाठपुरावा करून माहिती घेऊ शकते.

9.2 इतर व्यक्ती / भागधारकांमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होऊ शकतो:

9.2.1 पीडित व्यक्ती स्वतः

a) या योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळावी यासाठी पीडित व्यक्ती स्वतः DLSA कडे अर्ज करू शकते. अर्ज कसा असावा यासाठी या पुस्तिकेतील परिशिष्ट क्र. 2 चा वापर मार्गदर्शक म्हणून केला जाऊ शकतो.

b) जर पीडितेला लिहिता-वाचता येत नसेल, तर अर्ज करण्यासाठी ती DLSA कार्यालयाकडे मदतीसाठी विनंती करू शकते.

c) योजनेअंतर्गत नुकसानभरपाई मिळावी यासाठी पीडिता तिच्या वतीने DLSA कडे अर्ज करण्यासाठी तिच्या पालकांना / तिच्या कायदेशीर प्रतिनिधीला / सहाय्यक व्यक्तीला / CWC ला / संरक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना सांगू शकते.

---

### 9.2.2 **बालकल्याण समिती** (CWC)

बालकांसाठी न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम 2015, अर्थात ज्युवेनाईल जस्टीस ऍक्ट (JJ Act) अंतर्गत स्थापन झालेली बाल कल्याण समिती (CWC) ही बालकांची काळजी आणि संरक्षणाची गरज पुरविण्यासंबंधी सर्व बाबींचे निराकरण करण्यासाठी जबाबदार असते. याला थोडक्यात CNCP[2] म्हणजे Children in Need of Care and Protection असे म्हणतात

### 9.2.2.a पीडितांना सुलभतेने भरपाई मिळवून देण्यासाठी CWC का जबाबदार आहे?

a) बाल न्याय (JJ Act) 2015 **च्या कलम** 29 (1) अंतर्गत, पीडित बालकांची काळजी घेणे, त्यांना संरक्षण देणे, उपचार करणे, त्यांचा विकास घडविणे आणि पुनर्वसन करणे यासंबंधी निर्णय घेण्याची जबाबदारी CWC वर सोपविण्यात आली आहे. तसेच, त्या बालकांच्या मूलभूत गरजा पुरविण्याची जबाबदारीही CWC वर आहे.

b) POCSO **कायद्याच्या नियम** 8 द्वारे, भरपाई रकमेच्या देयकासाठी DLSA ला शिफारस करण्याचा अधिकार CWC ला आहे. कारण लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांना विशेष मदतीसाठी त्यांच्या प्रकरणाचे मूल्यांकन CWC करू शकते.

c) JJ **कायदा** 2015 नुसार, प्रकरणाच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल CWC ने जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे. हा अहवाल अर्ज क्रमांक 15 आणि अर्ज क्रमांक 16 नुसार द्यायचा असतो. पीडित बालक नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्यास त्याबाबतची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती देखील CWC ने त्या अहवालात द्यायची असते. **(महाराष्ट्र बाल न्याय नियम 2018, नियम 17 (i), नियम 17 (v), आणि नियम 20 (2)).**

---

**[2] या शब्दाचा वापर JJ Act च्या कलम 2(14) मध्ये निर्दिष्ट केलेला आहे. या अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुकीसह इतर कोणत्याही स्वरूपाच्या हिंसाचार आणि अत्याचाराला बळी पडलेल्या असुरक्षित बालकांच्या विविध श्रेणींचा समावेश होतो.**

### 9.2.2.b CWC पीडितांना पुढील मार्गांनी भरपाईची सुविधा देऊ शकते

**a)** तपास अधिकाऱ्याला बोलावून घेऊन पीडितासाठी भरपाईची प्रक्रिया सुरू करण्यास किंवा पाठपुरावा करण्यास सांगणे.

**b)** पोलिसांनी एफआयआरची प्रत आणि गुन्ह्याचा तपशील DLSA कडे पाठवला नसेल, तर लैंगिक अत्याचार पीडित बालकासाठी भरपाईची प्रक्रिया सुरू करण्याचा अर्ज CWC दाखल करू शकते.

**c)** भरपाईसाठी पीडित बालकाच्या वतीने त्याच्या समर्थकाला (POCSO कायदा 2012 अंतर्गत नियुक्त केले असल्यास) किंवा बाल कल्याण अधिकारी / परिवीक्षा अधिकारी यांना DLSA कडे अर्ज दाखल करण्याचे निर्देश CWC देऊ शकते. तसेच, भरपाईची सुविधा त्या पीडित बालकाची काळजी घेण्याच्या योजनेचा अविभाज्य भाग असल्याचे सुनिश्चित करण्याची सूचना दोन्ही संबंधितांना देऊ शकते.

**d)** पीडित बालकाला **JJ Act 2015 च्या कलम 30 (xvii)** मध्ये म्हटल्यानुसार मोफत कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी DLSA शी समन्वय साधू शकते. पीडित बालकाला नुकसान भरपाईसाठी DLSA कडे अर्ज करण्यासाठी प्राधिकरणाच्या वकिलासोबत CWC समन्वय साधू शकते.

**e)** पीडित बालकासाठी अन्न, कपडे, वाहतूक किंवा आकस्मिक परिस्थितीत निर्माण झालेल्या त्याच्या इतर गरजा भागवण्यासाठी विशेष मदत म्हणून तत्काळ पैसे देण्याची शिफारस CWC द्वारे DLSA किंवा DCPU ला करता येते. **(नियम 8(1), POCSO नियम 2020)**.

**f)** पीडित बालकाला भरपाईची रक्कम मिळावी यासाठी त्याचे बँकेत खाते उघडणे, ओळखपत्राची व्यवस्था करणे इत्यादी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी DCPU किंवा बालकासाठी नेमलेल्या सहाय्यकाची मदत घेता येते. **(नियम 10(2), POCSO नियम 2020)**.

---

### 9.2.3 बाल कल्याण अधिकारी (CWO) / परिविक्षा अधिकारी (PO)

बालकल्याण अधिकारी (सामाजिक क्षेत्रात ते सामान्यत: परिविक्षा अधिकारी किंवा PO म्हणून ओळखले जातात) बालगृहाशी जोडलेले असतात. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या ज्या बालकांना CWC च्या आदेशानुसार बालगृहात ठेवलेले असते, त्यांची काळजी घेणे, त्यांना संरक्षण, समाजात त्यांचे पुनर्वसन करणे यासाठी CWC द्वारे दिलेल्या सर्व निर्देशांचे पालन करण्यास हे अधिकारी जबाबदार असतात. **(JJ Act 2015 चे कलम 2(17))**.

### 9.2.3.a पीडिताला सुलभपणे भरपाई मिळण्यासाठी CWO / PO का जबाबदार आहे?

**महाराष्ट्र बाल कायदा 2018 मधील नियम 64(1) नुसार**, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संबंधात CWC ने दिलेल्या सर्व निर्देशांचे पालन करण्यास CWO जबाबदार आहे. त्यातच पीडिताला नुकसान भरपाई मिळवून देण्याचा मुद्दाही समाविष्ट आहे.

### 9.2.3.b असे कोणते मार्ग आहेत ज्याद्वारे CWO/PO पीडितांना भरपाई मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ करू शकतात?

. बालकाला पीडित भरपाईच्या अधिकाराबद्दल जागरूक करून.

. पीडित भरपाई हा बालकाच्या वैयक्तिक काळजी योजनेचा अविभाज्य भाग बनवून.

. पीडिताला नुकसानभरपाई मिळण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी CWC च्या निर्देशानुसार किंवा स्वतःहून अथवा समर्थक व्यक्तीच्या माध्यमातून DLSA कडे भरपाईसाठी अर्ज करून.

. पीडित बालकाला भरपाई मिळण्यासाठी अतिरिक्त सेवेची गरज, जसे की बँक खाते, ओळखपत्रासाठी दस्तऐवज इत्यादी आवश्यक असल्यास ते CWC च्या निदर्शनास आणणे.

**नोंद:** संरक्षण गृहात राहणाऱ्या प्रौढ पीडितेला नुकसान भरपाईची सुविधा मिळवून देण्यासाठी PO किंवा अधीक्षक हे तपास अधिकाऱ्याशी किंवा पीडिताच्या कायदेशीर प्रतिनिधीशी समन्वय साधू शकतात अथवा पीडितेच्या वतीने थेट DLSA च्या अधिकाऱ्याकडे अर्ज करू शकतात.

---

### 9.2.4 सहाय्यक व्यक्ती

पीडित बालकाच्या मदतीसाठी बालकल्याण समितीद्वारे तपास आणि चाचणी प्रक्रियेद्वारे सहाय्यक व्यक्तीची नियुक्ती POCSO कायद्याच्या नियम 4(8) अंतर्गत केली जाते. या कायद्याअंतर्गत खटल्यात ही व्यक्ती सुनावणीपूर्व किंवा सुनावणी सुरू असताना पीडित बालकाला मदत करू शकते.

प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काहीवेळा CWC एखाद्या संस्थेचीच नियुक्ती 'सहाय्यक व्यक्ती' म्हणून करते आणि अशा संस्थेला सामान्यतः 'सहाय्यक संस्था' म्हणून संबोधले जाते.

#### 9.2.4.a पीडिताला सुलभतेने भरपाई मिळवून देण्यासाठी सहाय्यक व्यक्ती / सहाय्यक संस्था का जबाबदार आहे?

a) तपास आणि खटल्याच्या प्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींमध्ये पीडित व्यक्तीला मदत करणे आणि भरपाईबरोबरच त्याच्यासाठी असलेल्या विविध सेवा उपलब्ध करून देणे ही 'सहाय्यक व्यक्ती'ची जबाबदारी आहे.

b) पीडिताला, त्याच्या कुटुंबाला[3] किंवा पीडिताचा विश्वास असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला न्यायालयीन कामकाज आणि सुनावणी, आरोपीची अटक, जामीन आणि शिक्षेशी संबंधित तपासाची स्थिती / माहिती पुरवण्याची जबाबदारी **POCSO कायदा 2020 च्या कलम** 4 (15) नुसार 'सहाय्यक व्यक्ती'ची असते. तसेच, पीडिताला आपत्कालीन सहाय्य सेवा उपलब्ध करून देणे, नुकसानभरपाई लाभ मिळवून देणे ही जबाबदारीही सहाय्यक व्यक्तीची असते.

#### 9.2.4.b सहाय्यक व्यक्ती/समर्थन संस्था पीडिताला कोणकोणत्या मार्गांनी भरपाई मिळवून देऊ शकतात?

a) पीडिताला त्याच्या / तिच्या भरपाईच्या अधिकाराबद्दल जागरूक करणे; तसेच पीडिताला मोफत कायदेशीर सल्ला आणि मदतीचा अधिकार मिळवून देण्यासाठी CWC ची मान्यता आणि समर्थनासह DLSA कडे अर्ज करणे

b) नुकसानभरपाई बाबतची स्थिती CWC ला कळविणे. भरपाईची प्रक्रिया सुरू करण्यासाठी संबंधित पोलिस ठाण्याने एफआयआर आणि गुन्हा नोंदीचा तपशील DLSA कार्यालयाकडे पाठवला नसल्यास ती बाब CWC च्या निदर्शनास आणणे.

c) CWC कडून आदेश मिळवून पीडित बालकाचे बँक खाते उघडण्यासाठी, त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार ओळखपत्राकरता दस्तऐवज मिळविण्यासाठी कार्यवाही करणे. [(**POCSO कायदा 2020 चे कलम 10(2)].**

[3] **ते मुलाच्या शोषणात गुंतलेले नसतील तर**

### 9.2.5 **जिल्हा बाल संरक्षण कक्ष** (DCPU)

बालन्याय कायद्याच्या (JJ Act) कलम 106 अंतर्गत राज्य सरकारद्वारे या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यात या कायद्याची आणि बाल संरक्षणविषयक इतर उपाययोजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे हा या कक्षाच्या कामकाजाचा केंद्रबिंदू आहे. जिल्हा स्तरावर बालन्याय कायद्याच्या अंमलबजावणीचे प्रमुख अधिकार या कक्षाला आहेत. **(महाराष्ट्र JJ Act 2018 चे कलम 88(2)).**

### 9.2.5.a पीडिताला सुलभपणे भरपाई मिळवून देण्यासाठी DCPU का जबाबदार आहे?

**a)** पीडित बालकांची चौकशी, त्यांच्याबाबत अहवालांचा पाठपुरावा आणि CWC द्वारे जारी केलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी DCPU ने CWC ला सहाय्य करणे आवश्यक आहे. [**महाराष्ट्र JJ Act 2018 चे कलम 88(1) (iii)**].

**b)** राज्य सरकारचे संबंधित विभाग, राज्य बाल संरक्षण सोसायटी आणि राज्यातील इतर जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्याशी आंतर-विभागीय समन्वय आणि संपर्काची जबाबदारी DCPU ची आहे. [**महाराष्ट्र JJ Act 2018 चे कलम 88(1) (xiii)**]. पीडिताला भरपाई मिळवून देण्यात पोलीस आणि DLSA कार्यालयाचाही समावेश असतो.

c) बालन्याय कायद्यांतर्गत (JJ Act) कार्यरत असलेल्या सामाजिक संस्थांशी संपर्क आणि समन्वय साधणे. [**महाराष्ट्र JJ Act 2018 चे कलम 88(1) (xiv)**].

d) बालन्याय कायद्यांतर्गत काम करणाऱ्या संबंधितांना प्रशिक्षण देणे, त्यांना सक्षम करणे तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जागरूकता निर्माण करणे, कार्यक्रम आयोजित करणे. [**महाराष्ट्र JJ Act 2018 चे कलम 88(1) (xxii)**] यामध्ये काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या पीडित बालकांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबतही संबंधितांना सक्षम करण्याचाही समावेश असू शकतो.

### 9.2.5.b DCPU कोणकोणत्या मार्गांनी पीडितांना भरपाई मिळवून देऊ शकतो?

**a)** संबंधित CWC च्या शिफारशीनुसार POCSO कायद्यांतर्गत येणाऱ्या पीडित बालकासाठी तत्काळ विशेष मदतीची सोय करा. (कलम 8(1)(ii), POCSO कायदा 2020)

b) CWC च्या आदेशानुसार पीडिताचे बँक खाते उघडण्यास, ओळखपत्रासाठी पुरावे इत्यादींची व्यवस्था करण्यास सहाय्य करणे. (कलम 10(2), POCSO कायदा 2020). त्यासाठी DCPU सहाय्यक व्यक्तीशी समन्वय साधू शकते किंवा DLSA ची मदत घेऊ शकते.

---

### 9.2.6 **बालकांसाठी विशेष पोलीस कक्ष** (SJPU)

जसा रेल्वेसाठी पोलिसांचा स्वतंत्र विभाग असतो, त्याच प्रकारे बालकांसाठी या विशेष पोलिस कक्षाची स्थापना जिल्हा किंवा शहर पोलिस दलामध्ये केली गेली आहे. बालन्याय कायद्याच्या (JJ Act) कलम 107 अंतर्गत बालकांना हाताळण्यासाठी हा वेगळा कक्ष आहे. मुलांशी व्यवहार करतात आणि जेजे कायदा 2015 च्या कलम 107 अंतर्गत मुलांना हाताळण्यासाठी नियुक्त केले जातात [**कलम 2( 55), जेजे कायदा 2015**].

### 9.2.6.a पीडितांना भरपाई मिळवून देण्यासाठी SJPU का जबाबदार आहे?

**a)** प्रत्येक जिल्हा आणि शहरात बालकांशी संबंधित पोलिस कार्यवाहीमध्ये समन्वय ठेवणे ही SJPU ची जबाबदारी आहे. [**(कलम 89(1), महाराष्ट्र JJ Act 2018)**].

b) तक्रारदार किंवा त्याच्या वतीने काम बघण्यासाठी अधिकृतपणे नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीला FIR ची प्रत, तपास अहवाल आणि इतर संबंधित कागदपत्रे सुपूर्द केली जातील याची खात्री करणे ही SJPU ची जबाबदारी आहे. **[कलम 89(8), महाराष्ट्र JJ Act 2018]** मनोधैर्य योजनेंतर्गत पीडितांची भरपाई ठरविण्यात FIR हा महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

c) पीडित बालकांना कायदेविषयक सहाय्य मिळवून देण्यासाठी SJPU जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी (DLSA) समन्वय साधू शकते. **[कलम 89(14), महाराष्ट्र JJ Act 2018]**. पीडिताला भरपाई मिळवून देण्यासाठी DLSA च्या सेवांचीही मागणी करता येऊ शकते.

d) इतर गोष्टींबरोबरच पीडित, पीडितेचे कुटुंब[4] किंवा पीडिताचा ज्याच्यावर विश्वास आहे अशा इतर कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक आणि खाजगी आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देणे, पीडिताला नुकसानभरपाईचा फायदा मिळवून देणे ही जबाबदारी **POCSO कायदा 2020 कलम 4(15)** नुसार SJPU वर आहे.

### 9.2.6.b SJPU पीडितांना कोणकोणत्या मार्गांनी नुकसान भरपाई मिळवून देऊ शकते?

**a)** भरपाईची प्रक्रिया सुरू करण्यासाठी, FIR नोंदवल्यानंतर त्या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे DLSA च्या कार्यालयाकडे पाठवली गेली आहेत याची खात्री करणे.

**b)** SJPU ने स्वतःहून किंवा सहाय्यक व्यक्तीच्या अथवा स्थानिक पोलिसांच्या समन्वयाने पीडिताला आणि / किंवा पीडिताच्या कुटुंबाला (जे योग्य असेल ते) नुकसान भरपाईच्या व्यवस्थेबद्दल माहिती देऊ शकते.

**c)** भरपाई मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी पीडित बालकाचा / त्याच्या कुटुंबाचा (जे योग्य असेल ते) / सहाय्यक व्यक्तीचा संपर्क DLSA कार्यालयाशी घडवून आणण्यासाठी SJPU ने मदत करणे.

**d)** मनोधैर्य योजनेंतर्गत पीडितांची नुकसानभरपाई ठरवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संबंधित पोलिस ठाण्यातून **DLSA** कडे पाठवली जातील याची दक्षता घेऊन त्यासाठी मदत करणे.

---

### 9.2.7 पीडितेचा कायदेशीर प्रतिनिधी

हे एकतर खटला चालवणारे सरकारी वकील (Public Prosecutor) किंवा DLSA ने दिलेले वकील किंवा पीडित व्यक्तीच्या संमतीने पीडितेचे प्रतिनिधित्व करणारे स्वतंत्र वकील असू शकतात.

### 9.2.7.a भरपाई मिळवून देण्यासाठी पीडितेचा कायदेशीर प्रतिनिधी का जबाबदार आहे?

पीडितेचा कायदेशीर प्रतिनिधी असल्याने पीडितेच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणे देखील त्याचे कर्तव्य आहे आणि त्यात नुकसानभरपाईच्या कायदेशीर अधिकाराचाही समावेश आहे. कायदेशीर प्रतिनिधीने पीडित व्यक्तीला तसेच तिची काळजी आणि संरक्षणासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीला तसे सूचित करणे आवश्यक असून, संबंधित विभागांशी समन्वय साधून नुकसानभरपाईची प्रक्रिया सुलभ करणे देखील आवश्यक आहे.

[4] **ते शोषणात सामील नसल्यास**

**9.2.7.b पिडीतेचा कायदेशीर प्रतिनिधी कोणकोणत्या मार्गांनी नुकसान भरपाई मिळवून देऊ शकतो?**

**a)** पीडिता आणि तिच्या कुटुंबाला[5] नुकसान भरपाईबाबत पीडितेचा कायदेशीर अधिकार आणि त्याचा लाभ कसा मिळवावा या प्रक्रियेची माहिती देऊ शकेल. पीडित जर बालक असेल तर भरपाईच्या अधिकाराबाबत त्याला आणि / किंवा त्याच्या कुटुंबाला (जे योग्य असेल ते) / CWC ला / CWO ला / सहाय्यक व्यक्तीला कळवू शकेल.

**b)** आवश्यकतेनुसार तपास अधिकारी, पीडित, CWC / सहायक व्यक्ती (पीडित बालक असेल तर), संरक्षणगृह / बालगृह कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने भरपाईची प्रक्रिया सुरळीत करू शकेल.

**c)** भरपाईची प्रक्रिया सुरू करण्यासाठी पीडितेच्या वतीने DLSA कडे अर्ज करून त्या प्रक्रियेशी संबंधितांना त्याबाबत माहिती देता येईल. पीडित जर बालक असेल तर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीने CWC द्वारे भरपाईच्या अर्जास मान्यता घेणे हा योग्य मार्ग आहे.

**d)** FIR मध्ये नोंदवलेली सर्व संबंधित कलमे त्या घटनेतील तथ्यांनुसार असल्याची व त्याद्वारे पीडित व्यक्ती नुकसान भरपाईसाठी पात्र ठरू शकेल याची खात्री करण्यासाठी पोलिसांशी समन्वय साधून काम करावे.



[5] जर ते शोषणात सामील नसतील

# 10 नुकसान भरपाईचे वितरण

**01** FIR मिळाल्यापासून 7 दिवसांच्या आत DLSA ने अंतरिम भरपाई द्यायची असते

**02** DLSA ने माहिती / अर्ज मिळाल्यापासून 120 दिवसांच्या आत नुकसान भरपाईच्या अंतिम अनुदानावर निश्चित निर्णय घेणे आवश्यक आहे

**03** जर पीडितेचे पुरावे न्यायालयात नोंदवले गेले असतील, तर हाच निर्णय एक महिन्याच्या आत घ्यावा लागतो

**04** जर पुरावे न्यायालयात नोंदवले गेले नसतील आणि फिर्यादीच्या आवाक्याबाहेरील कारणांमुळे खटला प्रलंबित राहिला असेल तर अर्ज मिळाल्यापासून एक वर्षाच्या आत निर्णय घ्यावा असे MSLSA च्या मार्गदर्शक तत्त्वांत सांगितले आहे

**05** निर्णयासाठी 1 वर्ष किंवा 120 दिवस प्रतीक्षा करण्याची गरज नसते, DLSA त्या आधीही योग्य वाटेल तेव्हा निर्णय घेऊ शकते

**06** निर्धारित मुदत संपून गेल्यानंतरही जर नुकसान भरपाई दिली गेली तर ती बाब DLSA च्या निदर्शनास आणून देण्यासाठी अर्ज देता येतो

## 10.1 नुकसान भरपाई देताना विचारात घेतलेले घटक

- गुन्ह्याची गंभीरता आणि पीडितेला झालेल्या मानसिक आणि शारीरिक हानीची तीव्रता.
- उपचाराठी, तपासासाठी, चौकशीसाठी किंवा सुनावणीसाठी केलेल्या प्रवासावर झालेला किंवा होणार असलेला खर्च
- मानसिक आघात, दुखापत, उपचार किंवा इतर कोणत्याही कारणामुळे शैक्षणिक संधी गमावली जाणे
- गुन्ह्याचा परिणाम होऊ रोजगार गमावावा लागणे
- पीडितेचे कोणत्याही प्रकारे गुन्हेगाराशी नाते असल्यास
- गुन्हेगाराने पीडितेवर एकदाच अत्याचार केला होता की काही काळ तो सुरू होता
- अत्याचारामुळे पीडिता गर्भवती झाली आहे का
- अत्याचारामुळे पीडितेला STD किंवा HIV हा आजार झाला आहे का किंवा अत्याचाराचा परिणाम म्हणून तिला कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आले आहे का
- पीडितेच्या पुनर्वसनाचा निर्णय तिची आर्थिक स्थिती पाहून त्यानुसार घेणे
- पीडितेचा मृत्यू झाला असेल तर तिचे वय, तिचे मासिक उत्पन्न, तिच्यावर अवलंबून असलेल्यांची संख्या, तिचे संभाव्य आयुर्मान, तिच्या भविष्यातील संभाव्य शक्यता इ.
- या व्यतिरिक्त DLSA मंडळाला योग्य वाटतील असे इतर कोणतेही घटक

## 10.2 परदेशी नागरिक असलेल्या पीडितांना भरपाई

जे परदेशी नागरिक भारतात असताना अत्याचार पीडित झाले आहेत, ते देखील मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

बलात्कारामुळे घटनेच्या कलम 21 अन्वये स्त्रीला दिलेल्या मुलभूत अधिकाराचे उल्लंघन होते आणि एखादी व्यक्ती, तिचे राष्ट्रीयत्व कुठलेही असो, तिला 'जगण्याचा हक्क' असल्याने ती सर्व घटनात्मक अधिकार मिळविण्यास पात्र आहे; त्यात सन्मानाने वागवले जाणे आणि संरक्षण मिळणे हेही अंतर्भूत आहे असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने रेल्वे मंडळाचे अध्यक्ष वि. चंद्रिमा दास[6] या खटल्यात नोंदविले आहे.

ज्याप्रमाणे या देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवाचे रक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे या देशाचे नागरिकत्व नसलेल्या व्यक्तीच्या जीवाचे रक्षण करणे हेही सरकारचे कर्तव्य आहे. त्यांनाही या देशात 'जगण्याचा' अधिकार आहे. जे लोक या देशाचे नागरिक नाहीत आणि केवळ पर्यटक म्हणून किंवा इतर कोणत्याही निमित्ताने येथे आलेले असतील, त्यांनाही आपल्या घटनात्मक तरतुदीनुसार त्यांच्या जीवाचे रक्षण करण्याचा अधिकार असेल. 'बलात्कार' हे घटनेच्या कलम २१ अन्वये महिलेला मिळालेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. त्यामुळे तिला नुकसान भरपाई देणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे.



[6] 2000, 2 SCC 465

# 11 वारंवार विचारले जाणारे प्रश्न

**1. 2017 मध्ये लागू झालेली मनोधैर्य योजना काय आहे?**

**उत्तर** - 'बलात्कार', 'बालकांवरील लैंगिक अत्याचार' आणि 'अ‍ॅसिड हल्ला' या गुन्ह्यांतील पीडितांना न्याय मिळेल अशी हमी देऊन, त्यांना आयुष्यात आणि समाजात पुनर्स्थापित करण्यासाठी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने काही निर्देश, सूचना आणि मार्गदर्शक तत्त्व जारी केले आहेत. त्यांचे पालन करून महाराष्ट्र राज्य सरकारने 2 ऑक्टोबर 2013 रोजी 'मनोधैर्य योजना' सुरू केली; तीच सुधारित स्वरूपात 1 ऑगस्ट 2017 रोजी लागू करण्यात आली आहे.

भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार एक समिती नेमण्यात आली. त्या समितीत स्वयंसेवी संस्था, संबंधित व्यक्ती, पक्षकार आणि वकिलांचा समावेश होता. त्यांच्या विविध सूचनांचा विचार करून रीतसर पद्धतीने ही योजना तयार करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात 18 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्यांसाठी 'अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायदा 1956 (PITA)' अंतर्गतक आधीपासूनच एक 'उज्ज्वला योजना' अस्तित्वात होती; आताच्या 'मनोधैर्य योजने'मध्ये 'बलात्कार', 'बालकांवरील लैंगिक अत्याचार' आणि 'अ‍ॅसिड हल्ला' या गुन्ह्यांतील पीडितांनाही सामावून घेण्यात आले आहे.

**2. मनोधैर्य योजनेचा लाभ मिळविण्यासाठी कोण पात्र आहेत?**

**उत्तर** - लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा अर्थात 'द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स ऍक्ट, 2012' (POCSO) अंतर्गत येणारे 'बलात्कार' आणि 'लैंगिक अत्याचार' पीडित, 'अ‍ॅसिड हल्ल्या'मुळे नुकसान, दुखापत झालेले पीडीत, तसेच यापैकी ज्यांचे व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे पुनर्वसन आवश्यक आहे असे पीडित या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पात्र ठरतात.

**3. मनोधैर्य योजनेच्या लाभासाठी कोण अपात्र ठरतात?**

**उत्तर** - पुढील पीडित / व्यक्ती या योजनेसाठी पात्र नाहीत:

i ज्यांचे वय 18 वर्षांपेक्षा जास्त आहे असे PITA अंतर्गत गुन्ह्यांचे पीडित, जे महाराष्ट्र राज्याच्या 'उज्ज्वला योजने'अंतर्गत येतात, ते मनोधैर्य योजनेसाठी पात्र नाहीत.

ii POCSO कायद्यांतर्गत बलात्कार, लैंगिक अत्याचार झाल्याचा अथवा अ‍ॅसिड हल्ला किंवा तत्सम कोणत्याही हल्ल्याची पीडित असल्याचा खोटा दावा करणारी महिला पात्र ठरत नाही.

iii मनोधैर्य योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून ज्यांचा उल्लेख नाही अशी कोणतीही व्यक्ती पात्र नाही.

(वैद्यकीय तपासणी करण्यास जाणूनबुजून नकार देणाऱ्या पीडितेचा भरपाईसाठी विचार केला जात नाही. तसेच, जी पीडिता मुद्दाम खटल्याच्या बाजूने राहात नाही आणि / किंवा तो खटला खोटा असल्याचे निष्पन्न झाले, तर पीडितेला योजनेंतर्गत दिलेली आर्थिक मदत परत घेण्याचा कायदेशीर अधिकार राज्य सरकारला आहे).

**4. एखाद्या प्रकरणात पीडित बालिकेने लैंगिक संबंध ठेवण्यास आपली 'संमती' होती व आपल्यावर त्यासाठी कोणतीही बळजबरी करण्यात आली नव्हती असे सांगितले, तर अशा स्थितीत ती मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईसाठी पात्र असेल का?**

**उत्तर** - होय. बालिकेच्या संमतीशिवाय किंवा संमतीने जरी लैंगिक संबंध ठेवला गेला असेल तर POCSO कायद्यांतर्गत (लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा) तो गुन्हा आहे. त्यामुळे ती बालिका मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाईसाठी पात्र आहे. या कायद्यांतर्गत घडलेल्या गुन्ह्यात पीडितेची संमती असली तरी त्याला काहीही अर्थ नाही.आर्थिक मदत परत घेण्याचा कायदेशीर अधिकार राज्य सरकारला आहे).

**5. 'मनोधैर्य योजने'अंतर्गत दिली जाणारी नुकसानभरपाईची रक्कम पीडिता व तिचे पालक यांच्या संयुक्त बँक खात्यात जमा करता येते का?**

**उत्तर** - जर पीडित बालिका / बालक 18 वर्षांपेक्षा कमी वयाचे असेल, तर भरपाईची रक्कम बालक आणि पालकांच्या संयुक्त बँक खात्यात, तसेच पीडित बालक अनाथ असल्यास त्याच्या आणि संरक्षण गृहाच्या संयुक्त बँक खात्यात जमा केली जाऊ शकते.

**6. पीडितेला इतर एखाद्या कायद्यांतर्गत किंवा योजनेंतर्गत भरपाई मिळालेली असेल, तरीही ती मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाई मिळविण्यासाठी दावा करू शकते का?**

**उत्तर** - होय. उदाहरणार्थ, पीडितेला ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत नुकसान भरपाई मिळाली असेल; तरी देखील ती मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईसाठी अर्ज करू शकते. तिच्या अर्जाचा नियमित प्रक्रियेनुसार विचार केला जाईल.

**7. बलात्कारित महिला किंवा POCSO (लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणारा कायदा) अंतर्गत पीडित बालक/बालिकेला डॉक्टरांकडे नेले जाते, तेव्हा त्यांनी तिला/त्याला मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाईसाठी DLSA (जिल्हा न्याय सेवा प्राधिकरण) कडे पाठवायला हवे का?**

**उत्तर** - या प्रकरणात आधी एफआयआर (प्राथमिक माहिती अहवाल) दाखल झाला आहे की नाही हे डॉक्टरांना तपासावे लागेल. तो दाखल झाला असेल, तर डॉक्टर ही केस 'मनोधैर्य योजने' अंतर्गत नुकसान भरपाईसाठी DLSA कडे पाठवू शकतात. जर एफआयआर दाखल झाला नसेल, तर डॉक्टरांनी पोलिसांना कळविले पाहिजे. FIR नोंदवणे पोलिसांना बंधनकारक आहे. त्यानंतर पोलिस किंवा डॉक्टर 'मनोधैर्य योजने'अंतर्गत भरपाई आणि इतर कायदेशीर सहाय्यासाठी या केसची माहिती DLSA ला कळवू शकतात. पीडितांना भरपाई मिळावी यासाठी अशा प्रत्येक प्रकरणाची माहिती पोलिसांनी DLSA ला देणे बंधनकारक आहे.

**8. जर पोलिसांनी एफआयआर आणि संबंधित दस्तऐवज योजनेंतर्गत निर्धारित केल्यानुसार एका तासाच्या आत DLSA कडे पाठवले नाहीत तर त्याचा काय परिणाम नुकसान भरपाईच्या अनुदानावर होईल?**

**उत्तर** - या योजनेत नुकसान भरपाई देताना एफआयआर, फौजदारी दंड संहितेच्या कलम 164 नुसार स्टेटमेंट आणि वैद्यकीय अहवाल इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे वेळेत न पाठवल्यास नुकसान भरपाई मंजूर करण्यात विनाकारण विलंब होऊ शकतो. पोलिसांनी एका तासाच्या आत कागदपत्रे पाठवली नसतील, तर DLSA ने ती मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात, पोलिसांकडून झालेल्या अशा विलंबाचा कोणताही परिणाम नुकसान भरपाईच्या निर्णयावर होत नाही.

**9. 'मनोधैर्य योजने'अंतर्गत भरपाईचा दावा करण्यासाठी काही विशिष्ट स्वरूपात अर्ज करावा लागतो का?**

**उत्तर** - 'मनोधैर्य योजने'अंतर्गत भरपाईसाठी अर्जाचे कोणतेही विशिष्ट स्वरूप नाही, तथापि या योजनेशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अर्ज क्रमांक 'I' सांगितलेला आहे. त्याच्या आधारे किमान सर्व आवश्यक माहिती खालीने दिली जाऊ शकते. जसे- अर्जदार पीडित व्यक्तीचे नाव, तिच्या/त्याच्या पालकांचा तपशील, घटनेची तारीख आणि वेळ, तक्रार/एफआयआर आणि वैद्यकीय तपासणीचा तपशील, प्रकरण प्रलंबित असल्यास किंवा निपटारा झाला असल्यास तसा तपशील, कोणत्याही सरकारी यंत्रणेकडून मिळालेल्या कोणत्याही प्रकारच्या इतर लाभाचा तपशील, करावा लागलेला आर्थिक खर्च/झालेल्या नुकसानीचा तपशील आणि गुन्ह्याबाबत किंवा गुन्हा करणाऱ्याविरुद्धचे दावे/कारवाईचे तपशील.

**10. ‘मनोधैर्य योजने’अंतर्गत भरपाईसाठी मागणी कशी करावी?**

**उत्तर** - पीडित व्यक्ती, तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती किंवा पीडितेचे पालक अथवा स्वयंसेवी संस्था हे गुन्ह्याच्या घटनेबद्दल एफआयआर दाखल करून किंवा संबंधित राज्य सरकार किंवा जिल्ह्याच्या विधी सेवा प्राधिकरणाला (DLSA) ‘ईमेल’ करून अथवा ‘एसएमएस’ पाठवून किंवा इतर कोणत्याही प्रकारे संपर्क साधून गुन्ह्याच्या घटनेची माहिती देऊ शकतात. त्याबरोबरच जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांनाही माहिती देता येऊ शकते.

**11. मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईसाठी कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक असते?**

**उत्तर** - या योजनेतील तरतुदीनुसार, बलात्काराची घटना नोंदविली जाताच संबंधित पोलीस स्टेशनच्या ठाणे अंमलदार (P.S.O./S.H.O.) यांनी पोलीस अधीक्षक (S.P.) किंवा उपायुक्त (D.C.P.) यांच्या मार्फत FIR/तक्रार, वैद्यकीय अहवाल आणि तपासी अधिकाऱ्याचा प्राथमिक अहवाल या सर्वांची एक-एक प्रत जिल्हा मंडळाच्या सचिवांकडे, जे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचेही (DLSA) सचिव असतात, अशा अधिकाऱ्याकडे पाठवावी.

**12. पीडितेच्या वतीने अन्य कोणी व्यक्ती अर्ज करू शकते का?**

**उत्तर** - पीडित जर बालक असेल तर त्याच्या/तिच्या वतीने पालक किंवा कोणतीही स्वयंसेवी संस्था अर्ज करू शकतात. मानसिक आरोग्यविषयक कायद्याच्या अर्थानुसार जर पीडित व्यक्ती ‘मानसिकदृष्ट्या आजारी’ किंवा ‘मंदबुद्धी’ असेल, तर पीडित व्यक्ती ज्यांच्यासोबत राहत होती ते पालक किंवा अधिकृत वैद्यकीय अधिकारी अथवा स्वयंसेवी संस्था अर्ज करू शकतात.

**13. पोलिसांनी मनोधैर्य योजनेसाठीचा अर्ज विशिष्ट स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे का?**

**उत्तर** - नाही. पोलिसांनी कोणताही अर्ज सादर करण्याची गरज नाही; त्यांनी फक्त गुन्हा घडल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे (DLSA) पाठवावी आणि उपलब्ध असल्यास एफआयआर, फौजदारी दंड संहितेच्या कलम 164 नुसार स्टेटमेंट आणि वैद्यकीय अहवाल पाठवावा. ही कागदपत्रे ईमेल किंवा एसएमएसद्वारे देखील पाठविता येतील.

**14. मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाई मंजूर करण्यासाठी जिल्हा मंडळाला न्यायालयाच्या शिफारशीची गरज असते का?**

**उत्तर** - नाही. मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाई मंजूर करण्यासाठी जिल्हा मंडळाला न्यायालयाच्या शिफारशीची गरज नसते. भरपाईसाठी अर्ज मंजूर करणे किंवा नाकारणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार फक्त जिल्हा मंडळाचा असतो.

**15. भरपाई किती प्रमाणात मिळावी याबाबतची मागणी अर्जदार व्यक्ती करू शकते का?**

**उत्तर** - आपले झालेले नुकसान किंवा दुखापत याबाबतची माहिती देऊन त्या प्रमाणात भरपाई मागण्याची पूर्ण मोकळीक पीडित व्यक्तीला असते.

**16. भरपाईसाठीचा अर्ज DLSA व्यतिरिक्त इतरही कुठे दाखल करता येतो का?**

**उत्तर** - होय. असा अर्ज NALSA च्या वेबसाइटवर देखील करता येऊ शकतो. या वेबसाईटची लिंक अशी:

https://nalsa.gov.in/services/victim-compensation

किंवा

गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध NALSA च्या मोबाइल ॲपवर देखील अर्ज केला जाऊ शकतो. त्याची लिंक अशी:
https://play.google.com/store/apps/details?id=com.nalsa.lsmsapp

**17. विनयभंग झाला असल्यास 'मनोधैर्य योजने'अंतर्गत भरपाईचा दावा केला जाऊ शकतो का?**

**उत्तर** - नाही. 30 डिसेंबर 2017 च्या शासन आदेशात (G.R.) नमूद असलेल्या गुन्ह्यांच्या प्रकरणातच भरपाईचा दावा केला जाऊ शकतो. ते असे: बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्याअंतर्गत (PITA) गुन्ह्यांतील अल्पवयीन पीडित.

**18. मनोधैर्य योजनेंतर्गत तालुका विधी सेवा समिती (TLSC) अर्ज स्वीकारू शकते का?**

**उत्तर** - नाही. पीडितेला झालेली इजा आणि तिचे पुनर्वसन यासाठी मनोधैर्य योजनेंतर्गत अर्ज हाताळण्याचे विशेष अधिकार फक्त जिल्हा मंडळालाच आहेत. त्यामुळे असा कोणताही अर्ज TLSC कडे गेला तरी तो संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडेच पाठवला जाईल.

**19. मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसानभरपाईचा दावा करण्यासाठी कालमर्यादा काय आहे?**

**उत्तर** - या योजनेंतर्गत अर्ज किंवा दावा करण्यासाठी अथवा संबंधित घटनेची माहिती देण्यासाठी कोणतीही विशिष्ट कालमर्यादा ठरविलेली नाही. काही बाबतीत मानसिक किंवा शारीरिक अपंगत्व अथवा तत्सम काही पटण्याजोगे कारण असल्यास अर्ज करण्यास किंवा माहिती देण्यास उशीर होऊ शकतो, पण तसे कारण नसेल तर अर्ज योग्य वेळेतच भरला जावा.

भरपाईसाठीचा अर्ज/दावा किंवा सूचना मिळाली आणि त्याच्या सत्यतेबद्दल समाधान झाले, की संबंधित विधी सेवा प्राधिकरण (SLSA / DLSA) हे अर्ज मिळाल्यापासून 7 (सात) दिवसांच्या आत पीडित व्यक्तीला रुपये 30,000/- (रुपये तीस हजार) इतकी रक्कम अंतरिम मदत म्हणून वितरित करू शकतात. भरपाईची पूर्ण रक्कम देताना ही आधी दिलेली रक्कम हिशोबात धरली जाते. संबंधित SLSA किंवा DLSA यांनी अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 120 दिवसांच्या कालावधीत अंतिम निर्णय घ्यायचा असतो.

**20. या योजनेंतर्गत पीडितांना भरपाई मिळवून देण्यात पोलिसांची भूमिका काय असते?**

**उत्तर** - बलात्कार, ॲसिड हल्ला इत्यादी घटना नोंदवल्याबरोबर संबंधित पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदाराने (P.S.O./S.H.O.) त्यासंबंधीचा FIR/तक्रार, वैद्यकीय अहवालाची प्रत, तपासी अधिकाऱ्याच्या प्राथमिक अहवाल ही कागदपत्रे पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपायुक्त (SP/DCP) यांच्यामार्फत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या (DLSA) सचिवांकडे पाठवायची असतात.

**21. या योजनेंतर्गत अर्ज विचारात घेण्यासाठी FIR बरोबर फौजदारी दंड संहितेच्या कलम 164 नुसार स्टेटमेंट जोडणे आवश्यक असते का?**

**उत्तर** - असे स्टेटमेंट आवश्यक असते. संबंधित पोलीस अधिकाऱ्याने ते देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. असे स्टेटमेंट अर्जासोबत सुरुवातीला जोडलेले नसले तरीही मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाईसाठीचा अर्ज विचारात घेतला जातो.

**22. 'अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायदा, 1956 (PITA)' अंतर्गत गुन्ह्यांतील पीडित व्यक्ती देखील मनोधैर्य योजनेंतर्गत अर्ज करू शकते का?**

**उत्तर** - बऱ्याचदा PITA अंतर्गत गुन्ह्यांतील काही पीडित 'मनोधैर्य योजने'त समाविष्ट असलेल्या विविध गुन्ह्यांचेही बळी ठरले असण्याची शक्यता असते. अशा पीडितांच्या अर्जाचा विचार मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाईसाठी केला जाऊ शकतो. तसेच, 'अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) कायदा, 1956' (PITA) अंतर्गत गुन्ह्यातील जे पीडित अल्पवयीन आहेत त्यांनाही 'मनोधैर्य योजने'मध्ये समाविष्ट केले जाते.

**23. मनोधैर्य योजनेंतर्गत पीडित व्यक्तीचा दावा अंतिमतः फेटाळला गेलेला असल्यास ती केस पुन्हा सुनावणीसाठी येऊ शकते का? किंवा पीडित व्यक्ती नव्याने अर्ज दाखल करू शकते का?**

**उत्तर** - सामान्यतः असे होत नाही, परंतु अपवादात्मक परिस्थितीत जिल्हा मंडळाकडून अर्जाचा फेरविचार केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या तांत्रिक कारणास्तव नुकसान भरपाईचा अर्ज नाकारला असेल आणि नंतर असे आढळले की त्या तांत्रिक कारणाने काही अडचण येत नव्हती, तर जिल्हा मंडळ अशा अर्जावर फेरविचार करू शकते.

**24. पीडित व्यक्तीला वैद्यकीय मदत मिळू शकते का?**

**उत्तर** - होय. वर उल्लेख असलेल्या सर्व प्रकारच्या पीडितांवर सर्व शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या रुग्णालयांत आणि/किंवा वैद्यकीय केंद्रांमध्ये अत्यंत प्राधान्याने आणि पूर्णपणे मोफत उपचार / शस्त्रक्रिया केल्या जातात.

> ***"छाप्याद्वारे सोडविलेल्या पीडित असुरक्षित साक्षीदार मानले जातील आणि त्यांना समुपदेशन आणि अंतरिम नुकसानभरपाईसह आवश्यक ते सर्व संरक्षण दिले जाईल."***
>
> **- वेद प्रकाश आर्य विरुद्ध सरकार** [C.R.M. (DB) 1477 of 2022]

## 25. पीडित किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना किती आर्थिक मदत मंजूर केली जाऊ शकते?

**उत्तर** - ही रक्कम पुढील तक्त्यानुसार दिली जाते:

सुधारित मनोधैर्य योजनेअंतर्गत पाडितांना मंजूर करावयाच्या अर्थसाहाय्याचा तपशिल

| अ. क्र. | घटनेची विवरण | अर्थसहाय्य | शेरा |
|---|---|---|---|
| १. | बलात्कार :— | | |
| | अ) घटनेचा परिणाम स्वरूप मानसिक धक्का बसून महिलेस कायमचे मतिमंदत्व/ शारीरिक अपंगत्व आले असेल, तर | रू १०,००,०००/— पर्यंत | मंजूर रक्कमेपैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पाडिताच्या नावे बॅंकेत मेदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडितास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैधकीय खर्चासाठी रु३०. हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | आ) सामुहिक बलात्कार व अशा प्रकरणी महिलेस गंभीर व तीव्र स्वरूपाची शारीरिक इजा झाली असेल, तर | रू १०,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | इ) बलात्काराच्या घटनेमुळे महिलेचा मुत्यू झाल्यास, | | |
| | १) मयत महिला कुटुंबातील कमावती महिला असेल तर | रू १०,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | २) मयत महिला कुटुंबातील कमावती महिला नसेल तर, | रू १०,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |
| | ई) बलात्काराच्या गुन्दयातील अन्य घटनांमधील पाडित महिला असेल तर | रू ३,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |
| २ | **POCSO** अंतर्गत बालकांवरील लैंगिक अत्याचार:— | | |
| | अ) घटनेमध्ये पीडित बालका लिंगभेद न करता कायमस्वरूपी मतिमंदत्व किंवा अपंगत्व आल्यास | रू. १०,००,०००/— पर्यंत | मंजूर रक्कमेपैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पीडीताच्या नावे बॅंकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडीतास तात्काळ अदा करण्यात येईल. (यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू.३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | आ) बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्हयातील अन्य घटनांमधील पीडीत महिला असेल तर | रू. ३,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |
| ३ | ॲसिड हल्ला:— | | |
| | अ) घटनेमध्ये पिडित महिला/बालकाचा चेहरा विद्रूप झाल्यास, शरिराच्या कोणत्याही दृष्य भागाची हानी झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास | रू. १०,००,०००/— पर्यंत | मंजूर रक्कमेपैकी ७५% रक्कम १० वर्षासाठी पीडीताच्या नावे बॅंकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. तर २५% रक्कमेचा धनादेश पीडीतास तात्काळ अदा करण्यात येईल. ( यामध्ये वैद्यकीय खर्चासाठी रू.३० हजार इतक्या रक्कमेचा समावेश आहे.) |
| | आ) असिड हल्ल्याच्या गुन्हयातील अन्य घटनांमधील पीडित महिला असेल तर | रू. ३,००,०००/— पर्यंत | वरीलप्रमाणे |

**26. पीडित व्यक्तीला दिलेली भरपाई वसूल केली जाऊ शकते किंवा रद्द केली जाऊ शकते अथवा परत घेतली जाऊ शकते का? जर तसे असेल, तर कोणत्या परिस्थितीत?**

**उत्तर** - होय. जर पीडित व्यक्तीने तपास आणि/किंवा खटला चालवण्यास समर्थन दिले नाही अथवा सहकार्य केले नाही, तर मनोधैर्य योजनेअंतर्गत दिलेली भरपाई वसूल केली जाऊ शकते.

**27. मनोधैर्य योजनेंतर्गत मिळालेल्या नुकसानभरपाईच्या रकमेच्या प्रमाणाबाबत पीडित व्यक्ती नाराज असल्यास तिला अपील करण्यासाठी काही तरतूद आहे का?**

**उत्तर** - तसे अपील करण्यासाठी कोणतीही तरतूद नाही. अर्थात, पीडित व्यक्ती उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करू शकते. तथापि नुकसान भरपाई रकमेच्या प्रमाणाबाबत पुनर्विचार करण्यासाठी जिल्हा न्याय सेवा प्राधिकरणाकडे (DLSA) लेखी अर्ज करणे हाच योग्य मार्ग आहे.

**28. भरपाईच्या रकमेचा वापर कसा होतो यावर जिल्हा न्याय सेवा प्राधिकरण लक्ष ठेवते का?**

**उत्तर** - मनोधैर्य योजनेंतर्गत दिलेल्या भरपाईच्या रकमेच्या वापरावर कोणतेही बंधन नसते. तथापि, कधीकधी पीडित व्यक्तीच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या हेतूने DLSA काही अटी लादू शकते किंवा नुकसान भरपाईच्या रकमेचा वापर करण्याचा मार्ग सुचवू शकते.

**29. एखाद्या पीडितेने नुकसानभरपाई स्वीकारण्यास आधी नकार दिला आणि नंतर ती मिळावी अशी इच्छा तिला झाली, तर काय करता येऊ शकते?**

**उत्तर** - अशा प्रकरणांमध्ये ती पीडिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे (DLSA) आधी दिलेल्या नकाराची कारणे स्पष्ट करून भरपाई मिळावी अशी विनंती करू शकते.

**30. एखाद्या प्रकरणात एफआयआर नोंदवताना बलात्कार किंवा POCSO ची कलमे लावलेली नसतील, मात्र बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार झाला असल्याचे नंतरच्या तपासात आढळून आले, तर पीडित व्यक्ती नुकसानभरपाईसाठी अर्ज करू शकते का?**

**उत्तर** - होय.

**31. एखाद्या पीडित व्यक्तीचा मृत्यू झाल्यास भरपाई कशा प्रकारे दिली जाऊ शकते?**

**उत्तर** - अशा प्रकरणांमध्ये मृत पीडितेवर अवलंबून असलेल्यांना भरपाई दिली जाऊ शकते.

**32. मनोधैर्य योजनेंतर्गत नोंदविलेल्या पीडितांची माहिती आणि इतर तपशील लोकांना तपासणीसाठी खुले करता येतात का?**

**उत्तर** - नाही. मनोधैर्य योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व पीडितांचे नाव आणि इतर तपशिलांचे संपूर्ण रेकॉर्ड अत्यंत गोपनीयतेने हाताळले जाते आणि ते लोकांना तपासणीसाठी सार्वजनिक केले जात नाही.

**33. जर एफआयआरमध्ये एकापेक्षा जास्त पीडितांची नोंद असेल, तर नुकसान भरपाई मंजूर करण्यासाठी प्रत्येक पीडितेचा विचार स्वतंत्र अर्जदार म्हणून केला जाईल का?**

**उत्तर** - होय. मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाई देण्यामागचा हेतू पाहता, एफआयआरमधील प्रत्येक पीडित व्यक्ती भरपाईसाठी आपला स्वतंत्र अर्ज करण्यास पात्र असते. त्या प्रत्येक अर्जावर प्रक्रियेनुसार स्वतंत्रपणे कार्यवाही केली जाते.

**34. भरपाईचा अर्ज करण्यासाठी बाल कल्याण समिती (CWC) किंवा निवारागृह अथवा संरक्षणगृह पीडितेला मदत करू शकतात का?**

**उत्तर** - होय. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या पीडित बालकांचे पुनर्वसन करणे हे बाल कल्याण समिती, निवारागृह आणि संरक्षणगृहांचे कर्तव्य आहे.

**35. महाराष्ट्रात लैंगिक छळ झालेली पीडित व्यक्ती परदेशी नागरिक असल्यास मनोधैर्य योजनेंतर्गत नुकसानभरपाईचा दावा करू शकते का?**

**उत्तर** - होय. या संदर्भात 'रेल्वे बोर्ड चेअरमन विरुद्ध चंद्रिमा दास (2000) 2 SCC 465' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. त्यानुसार, राज्य घटनेच्या कलम 21 अंतर्गत व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन होत असल्याने परदेशी नागरिकत्व असलेल्या पीडीत व्यक्तीलाही नुकसान भरपाई दिली जाऊ शकते.

**36. जिल्हा न्याय प्राधिकरण (DLSA) भरपाई मंजूर करण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊ शकते का?**

**उत्तर** - होय. बलात्कार, ॲसिड हल्ला किंवा POCSO अंतर्गत लैंगिक छळाच्या घटनेची माहिती मिळाल्यास DLSA स्वतः पुढाकार घेऊन पीडिताला नुकसानभरपाई देण्यासाठी जिल्हा मंडळासमोर प्रकरण सादर करू शकते.

**37. मनोधैर्य योजनेंतर्गत भरपाईसाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला अर्ज करताना DLSA कडे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडे अथवा एजन्सीकडे काही शुल्क भरावे लागते का?**

**उत्तर** - नाही. मनोधैर्य योजनेअंतर्गत भरपाईचा अर्ज करण्यासाठी कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. याउलट, असा अर्ज दाखल करण्यासाठी पीडितेला किंवा तिच्या कुटुंबाला मदत करणे DLSA ला बंधनकारक आहे.

**38. मनोधैर्य योजनेसाठी निधी कोण पुरवतो?**

**उत्तर** - राज्य सरकार या योजनेच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक अर्थसंकल्पात स्वतंत्र बजेट हेडखाली पुरेसे स्वतंत्र आर्थिक नियोजन करून योग्य निधी उपलब्ध करून देते.

# 12 पीडितांना भरपाईसाठी इतर योजना / कायदे

| क्रमांक | इतर योजना आणि त्या योजनांचे ठळक मुद्दे | योजनेचा अधिकृत संदर्भ |
|---|---|---|
| 1. | *महिला पीडित / लैंगिक अत्याचारातून सोडवलेले / इतर गुन्हे, यांसाठी महाराष्ट्र पीडित नुकसान भरपाई योजना, 2022*<br><br>**. अत्याचारामुळे नुकसान किंवा दुखापत झालेल्या आणि ज्यांना पुनर्वसन आवश्यक आहे अशा पीडित व्यक्ती किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांसाठी ही भरपाई योजना आहे.**<br>**. या योजनेंतर्गत मिळणारी भरपाईची रक्कम पुढील प्रमाणे -**<br><br>1. ॲसिड हल्ला पीडित : किमान रुपये 3 लाख आणि कमाल रुपये 8 लाख<br>2. बलात्कार पीडित : किमान रुपये ४ लाख आणि कमाल रुपये 7 लाख<br>3. ज्यांच्या पुनर्वसनाची गरज आहे अशा प्रकारची गंभीर शारीरिक किंवा कोणतीही मानसिक इजा झालेले पीडित : किमान रुपये १ लाख आणि कमाल रुपये 2 लाख<br>4. कोणताही हात, पाय आदी अवयव किंवा शरीराचा कोणताही भाग गमवावा लागल्याने अपंगत्व आलेले पीडित : किमान रुपये १ लाख आणि कमाल रुपये 5 लाख<br>5. अनैसर्गिक लैंगिक अत्याचार पीडित : किमान रुपये ४ लाख आणि कमाल रुपये 7 लाख<br>6. जीवितहानी : किमान रुपये 5 लाख आणि कमाल रुपये 10 लाख<br>7. जळीत पीडित : किमान रुपये 2 लाख आणि कमाल रुपये 8 लाख<br>8. सामूहिक अत्याचारामुळे झालेली दुखापत किंवा नुकसान : रुपये 10 लाख<br><br>. ही योजना POCSO 2012 कायद्याअंतर्गत येणाऱ्या पीडितांना लागू होत नाही.<br>. पीडित अनाथ अल्पवयीन असल्यास, त्याचे कोणीही पालक किंवा कायदेशीर सांभाळकर्ते नसल्यास मदत किंवा अंतरिम भरपाई तत्काळ वितरीत केली जाईल.<br>. नुकसान किंवा दुखापत झाल्याबद्दल इतर कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ पीडितेला मिळालेला नसावा. | **फौजदारी दंड संहिता 1973 च्या कलम 357A अंतर्गत. (1974 चा 2)**<br><br>**GR-दिनांक-25 जानेवारी 2022 :** महिला पीडित / लैंगिक अत्याचारातून वाचलेल्या / इतर गुन्ह्यांसाठी महाराष्ट्र पीडित नुकसान भरपाई योजना, 2022 |
| 2. | *माहेर योजना*<br><br>. या योजनेचा लाभ राज्यातील गरजू, बेघर, अपहरण झालेल्या, घटस्फोटित महिलांना, अविवाहित मातांना, लैंगिक शोषण झालेल्या, अनैतिक वाहतुकीला बळी पडलेल्या, त्रासलेल्या पीडित महिलांना होऊ शकतो.<br><br>. यात महिलांना सुरक्षित आणि संरक्षित वातावरण आणि मूलभूत सुविधा पुरविल्या जातात. विवाह लावून आणि नोकरी मिळवून देऊन या पीडितांचे पुनर्वसन सुनिश्चित केले जाते. | www.maharashtra.gov.in<br><br>https://gr.maharashtra.gov.in-/Site/Upload/Goverment%20Resolutions/Eglish/201402041434277530.pdf<br><br>सरकारी ठराव क्रमांक: माहेर-२०१२/क्र.३४९/०२<br><br>कोड:201402041434277530 |

| | | |
|---|---|---|
| | . या पीडित महिला ३० दिवसांच्या मुक्कामानंतर माहेर योजनेसाठी पात्र ठरतात.<br><br>. राज्यात पहिल्या महिन्याच्या वास्तव्यानंतर पीडितेला दरमहा रुपये 1000, तिच्या पहिल्या अपत्याला दरमहा रुपये 500 आणि दुसऱ्या अपत्याला दरमहा रुपये 400 दिले जातात. | |
| 3. | ***मिशन वात्सल्य***<br><br>. 'मिशन वात्सल्य' योजनेंतर्गत एकाच छताखाली अनेक सेवा उपलब्ध करून देणे हे या विशेष अभियानाचे उद्दिष्ट आहे.<br>. प्रत्येक बालकाचे बालपण निरोगी आणि आनंदी असावे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे<br>. या अंतर्गत बालकांसाठी संरक्षण सेवा आणि बाल कल्याण सेवांवर लक्ष केंद्रित केले जाते | www.maharashtra.gov.in https://wcd.nic.in/sites/dfault/files/GUIDLINES%200F%20 MISSION%20VATSLYA%20 DATED%2005%20JLY%2020 22.pdf<br><br>(शासन निर्णय क्रमांक – अनाथ -2021/प्र.क्र.49/का-03)<br><br>Govt. Resolution No.: Orphan-2021/No.49/03<br><br>कोड: 202108271536002730 |
| 4. | ***पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी***<br><br>. ॲसिड हल्ला पीडित महिलांना रुपये 1 लाख इतकी आर्थिक मदत दिली जाते<br>. पुरुष पीडितांच्या बाबतीत, दुखापतीचे प्रमाण आणि इतर निकष पाहून रुपये 1 लाखापर्यंत आर्थिक मदत दिली जाते | https://pmnrf.gov.i/en/about/ grant-to-acid-attack-victims<br><br>https://pmnrf.gov.in/assets/ uploads/ downloads/Appli cation_format_for_ Acid_ Attack_Vict im.pdf |

> ***"मिळालेल्या भरपाईच्या रकमेचा खर्च स्वतःच्या इच्छेने करण्याचे स्वातंत्र्य पीडित व्यक्तीला असावे. चूक करण्याचा अधिकार वैयक्तिक मोकळीक आणि स्वातंत्र्याच्या अधिकारात अंतर्भूत आहे; त्यावर नियमाने आणि मनमानीपणाने गदा आणली जाऊ नये..."***
>
> **-अचिया बिल्बी उर्फ अचिया सरदार विरुद्ध. पश्चिम बंगाल राज्य सरकार आणि इतर, 1 मार्च 2020 W.P. क्रमांक 233 (प), सब्यसाची भट्टाचार्य, जे.**

# परिशिष्ट I

## मनोधैर्य पीडित नुकसान भरपाई योजना
## (जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासाठी मार्गदर्शक तत्त्वे)
## अधिसूचना क्रमांक MSLSA/2018/445 दिनांक 22 फेब्रुवारी 2018

मनोधैर्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहेत

**1 जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे अर्ज करण्याची प्रक्रिया –**

अंतरिम / अंतिम नुकसान भरपाईसाठीचा अर्ज पीडित आणि / किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती किंवा त्या क्षेत्राच्या S.H.O. / P.S.O. द्वारे दाखल केला जाऊ शकतो. त्याची रचना नमुना अर्ज- I प्रमाणे असावी. त्यासोबत पोलिसांकडील प्राथमिक माहिती अहवाल (FIR), वैद्यकीय अहवाल, पीडिताचा मृत्यू झाला असल्यास तसे प्रमाणपत्र, फौजदारी दंड संहिता कलम 164 नुसार पीडित व्यक्तीचा जबाब जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सादर करावा. खटल्याची सुनावणी पूर्ण झालेली असेल व न्यायालयाचा निकाल / शिफारस उपलब्ध असेल तर त्याचीही प्रत जोडावी..

**2 अर्ज दाखल करण्याचे ठिकाण –**

भरपाईसाठी अर्ज किंवा शिफारस संबंधित जिल्हा मंडळाकडे पाठवता येईल. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) ते प्रकरण स्वतःकडे ठेवू शकते, चौकशी करू शकते आणि निर्णय घेऊ शकते किंवा कोणत्याही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे गेलेला अर्ज / शिफारस मागवून घेऊ शकते.

**3 गुन्हेगारी प्रकरणातील दुखापतीबाबत मदत आणि पुनर्वसनासाठी जिल्हा मंडळ**

a) प्रत्येक जिल्ह्यात DLSA द्वारे 'मनोधैर्य योजनेंतर्गत गुन्हेगारी प्रकरणातील दुखापतींबाबत मदत आणि पुनर्वसनासाठी जिल्हा मंडळ' स्थापन केले जाईल.

b) या योजनेअंतर्गत त्या जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करण्याचे विशेष अधिकार या मंडळाकडे असतील.

c) या मंडळाच्या प्रमुखपदी अध्यक्ष म्हणून जिल्हा न्यायाधीश / जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील आणि मंडळात पुढील इतर चार सदस्य असतील -

1. पोलीस अधीक्षक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी

2. महिला व बालकांच्या सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील अनुभव असलेल्या महिलेस जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एक वर्षाच्या कालावधीसाठी नामनिर्देशित करू शकतात. (कोणत्याही नामनिर्देशित सदस्याला दोनदा नामनिर्देशित केले जाऊ शकते). जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील अनुभवी महिलेचे नाव नामनिर्देशित करावे.

3. जिल्हा शल्यचिकित्सक किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी अथवा जिल्हा आरोग्य आणि कुटुंब कल्याण अधिकारी / जिल्हा वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी.

4. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव हे जिल्हा मंडळाचे सदस्य सचिव असतील. त्यांच्याकडे वित्तीय अधिकार असतील. त्यांनी कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत मनोधैर्य सहाय्य या नावाने खाते उघडावे.

**4 जिल्हा मंडळाचे अधिकार**

i. POCSO अंतर्गत बलात्कार, ॲसिड हल्ला आणि लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांबाबत दाखल झालेल्या दाव्यांचा विचार करण्याचा आणि आर्थिक मदत देण्याचा अधिकार, तसेच एखाद्या प्रकरणाबाबत योग्य वाटल्यास इतरही मदतीचे आणि पुनर्वसन उपायांचे आदेश देण्याचा अधिकार मंडळाला असेल.

i. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मंडळाचे अध्यक्ष या नात्याने त्यांना फौजदारी दंड संहितेअंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करतील. किंवा या योजनेअंतर्गत कामकाज करण्यासाठी राज्य / केंद्र सरकारच्या इतर कोणत्याही कायद्यांतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करतील.

**5 जिल्हा मंडळाचे कार्य**

मंडळाच्या घटनेनुसार ही कार्ये अशी:

1. मनोधैर्य योजनेंतर्गत सांगितलेल्या प्रक्रियेनुसार, POCSO अंतर्गत येणारे बलात्कार, लैंगिक अत्याचार प्रकरणांचे दावे, तसेच ॲसिड हल्ल्याच्या प्रकरणांच्या दाव्यांचा विचार करणे आणि त्यानुसार आर्थिक मदत / पुनर्वसन प्रदान करणे.
2. बलात्कार पीडितांना कोणत्याही कायदेशीर, वैद्यकीय, मानसोपचारविषयक किंवा इतर कोणत्याही प्रकारे मदत प्रदान करण्याच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवणे.
3. बलात्कार पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्य किंवा केंद्र सरकारने तयार केलेल्या इतर कोणत्याही योजनेचा वापर करणे.
4. पीडितांसाठी मानसिक, वैद्यकीय आणि कायदेशीर मदतीची व्यवस्था करणे.
5. पीडितांना समुपदेशनाचे सहाय्य मिळवून देणे.
6. खटल्याची सुनावणी पूर्ण होईपर्यंत पीडित आणि साक्षीदारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे.
7. तपासाच्या प्रगतीचा कालबद्ध आढावा घेणे.
8. तरुण पीडितांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण किंवा स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी सहाय्य उपलब्ध करून देणे.
9. पीडितांच्या योग्य पुनर्वसनासाठी इतर कोणतीही योग्य मदत पुरविणे.
10. त्या काळातील परिस्थितीची गरज म्हणून पिडीतांसाठी निवाऱ्याची व्यवस्था करणे.
11. खटल्यातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार हितकारक आणि आवश्यक वाटेल असे इतर कोणतेही कार्य करणे.

### 6. मंडळाकडे भरपाईसाठी दावा दाखल करण्याची प्रक्रिया

अ) बलात्काराच्या घटनेची नोंद होताच, या योजनेत सांगितल्यानुसार संबंधित पोलिस ठाण्याचे PSO/SHO यांनी SP/DCP मार्फत त्या घटनेच्या FIR / तक्रारीची प्रत, वैद्यकीय अहवाल आणि तपास अधिकाऱ्याने (I.O.) केलेल्या प्राथमिक चौकशीचा अहवाल जिल्हा मंडळाच्या सचिवांना पाठवावा.

b) (1) या योजनेतील तरतुदींनुसार पीडित व्यक्तीला आर्थिक मदत आणि पुनर्वसनासाठी पीडित किंवा तिचा कायदेशीर वारस किंवा कोणी व्यक्ती / महिलांसाठी काम करणारी स्वयंसेवी बिगर सरसकारी संस्था (NGO) किंवा सरकारमान्य संस्था हे 60 दिवसांच्या आत जिल्हा मंडळाकडे अर्ज करू शकतात.
जर अर्ज करताना 60 दिवसांची मुदत उलटून गेली असेल, तर विलंबाच्या कारणाबाबत लेखी पत्रावर समाधान झाल्यास मंडळ विलंब चालवून घेईल.

(2) पीडित अर्जदार जर...
i. पीडित जर बालक असेल, तर त्याच्या / तिच्या वतीने पालक, सांभाळकर्ते, कोणतीही स्वयंसेवी संस्था, सरकारमान्य संस्थेद्वारे अर्ज केला जाऊ शकतो.
ii. पीडित जर मानसिक आरोग्य कायद्याच्या अंतर्गत मानसिकदृष्ट्या आजारी असेल किंवा मतिमंद असेल, तर तो / ती सामान्यत: ज्यांच्यासोबत राहते अशा व्यक्तीमार्फत किंवा अधिकृत वैद्यकीय अधिकारी किंवा स्वयंसेवी संस्थेद्वारे अर्ज केला जाऊ शकतो.

c) भाग (b) अंतर्गत करावयाचा अर्ज विहित मसुद्यात (परिशिष्ट - 1) सादर केला पाहिजे आणि त्यासोबत FIR / तक्रारीची प्रत, वैद्यकीय अहवाल, मृत्यू झाला असल्यास तसे प्रमाणपत्र किंवा पोलिसांनी FIR दाखल केला नसल्यास त्याबाबत न्यायालयात केलेली तक्रार, FIR नोंदविला न जाण्याची कारणे, असल्यास वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे जोडावीत.

d) मंडळाने आर्थिक मदत मंजूर केल्यानंतर ती तात्काळ अर्जात नोंदविलेल्या बँक खात्यात जमा केली जाईल. पीडिताला तातडीने दिलासा मिळावा यासाठी ती रक्कम शक्यतो ऑनलाईन पद्धतीने त्वरित जमा केली जाऊ शकते.

### 7. नुकसान भरपाई देताना विचारात घ्यावयाचे घटक

भरपाईचा निर्णय घेताना, जिल्हा मंडळ पीडित व्यक्तीचे झालेले नुकसान किंवा दुखापतीशी संबंधित पुढील बाबी विचारात घेऊ शकते:

(1) गुन्ह्याचे गांभीर्य, पीडित व्यक्तीला झालेल्या मानसिक, शारीरिक दुखापतीची तीव्रता;
(2) पीडित व्यक्तीच्या शारीरिक आणि / किंवा मानसिक आरोग्यासाठी वैद्यकीय उपचारांवर झालेला खर्च, अंत्यसंस्कार, तपास / चौकशी / सुनावणीसाठी कराव्या लागलेल्या प्रवासाचा खर्च (आहारासाठी झालेल्या खर्चाव्यतिरिक्त);

(3) गुन्ह्याचा परिणाम म्हणून शैक्षणिक संधी गमवावी लागणे; ज्यात मानसिक आघात, शारीरिक दुखापत, वैद्यकीय उपचार, गुन्ह्याचा तपास आणि खटला किंवा इतर कोणत्याही कारणामुळे शाळा / महाविद्यालयात गैरहजर राहावे लागण्याचा समावेश असू शकतो;

(4) गुन्ह्याचा परिणाम म्हणून नोकरीत नुकसान होणे; ज्यात मानसिक आघात, शारीरिक दुखापत, वैद्यकीय उपचार, गुन्ह्याचा तपास आणि खटला किंवा इतर कोणत्याही कारणामुळे नोकरीच्या ठिकाणी गैरहजर राहावे लागणे;

(5) पीडितेचा गुन्हेगाराशी कुठल्याही प्रकारचा नातेसंबंध असणे;

(6) अत्याचार ही पीडितेबाबत एकदाच घडलेली घटना होती की काही काळ तो सुरू होता;

(7) अत्याचाराचा परिणाम म्हणून पीडिता गर्भवती झाली आहे का;

(8) अत्याचाराचा परिणाम म्हणून पीडितेला लैंगिक संक्रमित रोग (STD) झाला आहे का;

(9) अत्याचाराचा परिणाम म्हणून पीडितेला HIV झाला आहे का;

(10) अत्याचारामुळे पीडितेला काही अपंगत्व आले आहे का;

(11) अत्याचार पीडितेच्या पुनर्वसनाची गरज ठरविण्यासाठी तिची आर्थिक स्थिती बघणे;

(12) अत्याचारामुळे पीडितेचा मृत्यू झाल्यास, तिचे वय, मासिक उत्पन्न, तिच्यावर अवलंबून असलेल्यांची संख्या, तिचे संभाव्य आयुर्मान आणि भविष्यातील शक्यता विचारात घेणे.

(13) या शिवाय न्याय्य आणि योग्य वाटतील अशा इतर कोणत्याही घटकांचा विचार जिल्हा मंडळ करू शकते.

**8. अंतरिम मदत आणि पुनर्वसन**

अ) कलम ६ अंतर्गत, पोलिसांकडून माहिती मिळाल्यावर जिल्हा मंडळाने मनोधैर्य योजनेनुसार शक्यतो सात दिवसांच्या आत पीडितेला अंतरिम मदत वितरीत करावी;

b) ज्या प्रकरणांमध्ये कलम ६ अंतर्गत अर्ज केला गेला असेल, त्यात पोलिस आणि वैद्यकीय अहवाल मिळाल्यानंतर आणि बलात्कार घडल्याची प्रथमदर्शनी खात्री झाल्यानंतर मंडळाने दिनांक 30 डिसेंबर 2017 च्या अधिसूचनेमध्ये सांगितल्यानुसार शक्यतो सात दिवसांच्या आत अंतरिम आर्थिक मदतीचा आदेश द्यावा.

c) तक्रार प्राप्त झाल्यानंतर आणि पीडितेची माहिती घेतल्यानंतर, प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार पीडितेचे कशा प्रकारे पुनर्वसन करणे आवश्यक आहे ते ठरवून त्याच्या पूर्ततेसाठी खर्चासह योग्य कार्यवाही मंडळ सुरू करेल.

d) भाग (b) आणि (c) अंतर्गत अंतरिम आणि इतर सवलती देण्याआधी मंडळाने त्या दाव्याबद्दल स्वतः खात्री करून घेणे आवश्यक आहे. दाव्याच्या स्वरूपाविषयी प्राथमिक मूल्यांकन करणे तसेच वैद्यकीय अहवाल आणि इतर पुरावेही विचारात घेणे आवश्यक आहे.

e) पीडितेला आर्थिक मदतीव्यतिरिक्त तिचे पुनर्वसन आणि / किंवा इतर कोणत्याही विशेष गरजांसाठी मंडळ योग्य ते निर्देश जारी करू शकते.

**9) मदतीची पूर्ण रक्कम देणे**

(अ) ज्या तारखेला फिर्यादीने खटल्याच्या सुनावणीत पुरावे दिले त्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, किंवा फिर्यादीच्या आवाक्याबाहेरील कारणांमुळे पुराव्याच्या नोंदींना अवाजवी विलंब झाला असेल अशा प्रकरणांमध्ये अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, यापैकी जे आधी असेल त्या तारखेला मंडळ अंतिम हप्ता म्हणून उर्वरित मदतीचे वितरण करेल.

(b) ज्या प्रकरणांमध्ये फिर्यादीच्या पुराव्याची नोंद करण्यापूर्वीच अंतिम दिलासा दिला जातो, त्या प्रकरणात तसे करण्याचे कारण मंडळ लेखी स्वरूपात देईल.

(c) प्रत्येक प्रकरणात आर्थिक मदतीची रक्कम ठरवताना पीडितेच्या विशेष गरजांबद्दलची माहिती मंडळाला देण्यात येईल;

(d) प्रत्येक प्रकरणात मंडळ पीडितेच्या पुनर्वसनाच्या उपायांबाबत सूचना करते, त्या व्यवस्थे व्यतिरिक्त आर्थिक मदतची वेगळी रक्कम दिली जाते.

(e) पीडित अल्पवयीन असल्यास, भरपाईची रक्कम मनोधैर्य योजनेत सांगितल्याप्रमाणे दिली जाईल.

(f) मंडळाने निर्णय घेताना कायम पीडित व्यक्तीचे सर्वोच्च हित लक्षात घेतले पाहिजे;

**10. भरपाईचा दावा नाकारणे**

(अ) मंडळ भरपाईचा असा अर्ज नाकारू शकते, ज्याबाबत त्याचे मत पुढील प्रमाणे असेल -

(i) जर पीडित व्यक्ती तिला झालेल्या दुखापतीस कारणीभूत असलेल्या परिस्थितीबाबत योग्य ती माहिती पोलिसांना, इतर संबंधित संस्थांना किंवा मंडळाची मान्यता असलेल्या व्यक्तीला विनाविलंब कळविण्यात अपयशी ठरली; किंवा

(ii) आरोपी / हल्लेखोराला शिक्षा मिळवून देण्याच्या प्रयत्नात जर अर्जदार पीडित पोलीस किंवा न्यायालयाला सहकार्य करण्यात अपयशी ठरली; किंवा

(iii) अर्जदार पीडित तिच्यासंबंधी मंडळाला योग्य सहकार्य करण्यात अपयशी ठरली;

(iv) पीडित व्यक्तीला मदत आणि पुनर्वसनासाठी एकाच प्रकरणात एकाच योजनेंतर्गत यापूर्वीही दावा दाखल केला गेला असेल आणि त्यावर निर्णय झाला असेल;

(v) अर्जदाराने स्वतः तक्रार दाखल केल्यानंतरही खटल्याच्या सुनावणीवेळी पलटला, खटल्याच्या बाजूने राहिला नाही तर.

## 11. मंडळाची कामकाज करण्याची पद्धत

(i) अर्ज किंवा तक्रारीची सुनावणी अथवा तपासणी कोणत्यावेळी आणि कुठे करायची हे मंडळ स्वतः ठरवू शकते.

(ii) साधारणपणे मंडळ कागदपत्रे आणि पुरावे मिळाल्यावर, प्रकरण सुनावणीयोग्य आहे याबाबत प्रथमदर्शनी समाधान झाल्यावर, पीडितेची आणि / किंवा तिच्या प्रतिनिधीची सुनावणी घेऊन अंतरिम मदत आणि इतर दिलासा देण्याचे आदेश देऊ शकते.
तथापि, ज्या प्रकरणांमध्ये पीडित व्यक्तीची आणि इतर पक्षांची तपासणी करणे आवश्यक आहे असे मंडळाला वाटते, त्या प्रकरणाची सुनावणी करून आणि संबंधितांचे जबाब नोंदवून पीडितेच्या हक्काबद्दल आदेश देऊ शकतात.
यात पुढे असेही आहे की, अर्ज नाकारला जाणार असेल तरी अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते आणि नकाराची लेखी कारणे दिली जातात.

(iii) कोणत्याही बैठकीची गणपूर्ती (पूर्ण कोरम) होण्यासाठी किमान तीन सदस्य उपस्थित असावे लागतात;

(iv) अर्जदाराला त्याच्या अर्जाच्या सुनावणीची वेळ आणि ठिकाण मंडळाद्वारे कळविले जाईल.

(v) मंडळाचे कामकाज बंद खोलीत होईल आणि कायम कुठल्याही परिस्थितीत, पीडित व्यक्तीची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल;

(vi) मंडळाच्या कामकाजाची माहिती सार्वजनिक ठिकाणी मुद्रित, प्रकाशित, प्रसारित केली जाणार नाही किंवा कुणालाही पाठविली जाणार नाही;

(vii) माहितीचा अधिकार कायद्यांतर्गतही मंडळाच्या कामकाजाची माहिती मागता येणार नाही.

## 12. पिडीत व्यक्तीला मदत आणि पुनर्वसनाच्या निर्णयाचे नियमन करणारी तत्त्वे

नुकसान भरपाई आणि इतर सवलती निश्चित करताना बोर्ड पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करेल -

(i) मंडळ पुनर्वसन आणि इतर खर्च ठरवताना पुढील बाबी लक्षात घेईल -

(a) पीडितेला झालेल्या शारीरिक दुखापतीचा प्रकार आणि त्याची तीव्रता, केलेले किंवा करावे लागणारे वैद्यकीय उपचार आणि मानसिक समुपदेशनासाठीचा खर्च.

(b) बलात्कारामुळे पीडिता गर्भवती राहिली असेल तर करावा लागलेला खर्च, तसेच बलात्कारामुळे राहिलेल्या गर्भाचा गर्भपात केला असेल तर त्यासाठी झालेला खर्च.

(c) पीडित व्यक्तीला रोजगारासाठी किंवा स्वयंरोजगारासाठी कोणतेही शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी झालेला किंवा करावा लागणार असलेला खर्च.

(d) गुन्ह्यामुळे व्यवसाय किंवा नोकरीत व्यत्यय आल्यामुळे पीडितेचे झालेले आर्थिक नुकसान ब त्याबद्दल मंडळाने केलेले मूल्यांकन;

(e) आर्थिक नुकसानाव्यतिरिक्त दुखापत, मानसिक किंवा भावनिक आघात, मानहानी किंवा अडचण यामुळे झालेले पीडितेचे नुकसान.

(ii) पीडितेला मदत आणि पुनर्वसनाची व्यवस्था करण्यासाठी मंडळ राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांचा, तसेच सरकारद्वारे पूर्णतः किंवा अंशतः निधी मिळत असलेल्या संस्थांचा शक्य तितका उपयोग करून घेईल.

**13. भरपाई मंजूर करण्याची प्रक्रिया**

(1) ज्याअर्थी नुकसान भरपाईसाठी न्यायालयाने कायद्यातील कलम 357A चे पोटकलम (2) आणि / किंवा पोटकलम (3) अंतर्गत शिफारस केली आहे, किंवा कोणत्याही पीडित व्यक्तीने अथवा तिच्यावर अवलंबून असलेल्यांनी फौजदारी दंड संहितेच्या कलम 357A च्या पोटकलम (4) अंतर्गत जिल्हा मंडळाकडे अर्ज केला असेल, त्याअर्थी ते मंडळ ते प्रकरण तपासेल आणि गुन्ह्यामुळे झालेले नुकसान / दुखापत आणि पुनर्वसना संदर्भात पीडितेच्या दाव्यातील माहितीची पडताळणी करेल आणि दाव्याचा विचार करण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही माहिती संबंधितांकडून मागवेल:
अत्यंत कठीण आणि गंभीर अशा अपवादात्मक प्रकरणांमध्ये वस्तुस्थितीच्या प्राथमिक पडताळणीनंतर, जिल्हा मंडळाचे सचिव स्वत: पुढाकार घेऊन किंवा पीडितेमार्फत अर्ज मागवून घेऊन अंतरिम मदत आणि सहाय्य देण्याचा अहवाल मंडळासमोर ठेवू शकतात.

(2) चौकशी जलदगतीने पूर्ण करण्यात यावी. दावा / याचिका किंवा शिफारस मिळाल्यापासून कोणत्याही परिस्थितीत 120 दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागू देऊ नये.

(3) प्रकरण विचारात घेऊन त्यातील तथ्यांबद्दल समाधान झाल्यानंतर, मार्गदर्शक तत्त्वांच्या खंड 12 मध्ये नमूद केलेले घटक विचारात घेऊन जिल्हा मंडळ पीडितेला किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्यांना द्यावयाच्या भरपाईची रक्कम निश्चित करेल.

(4) योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी जिल्हा मंडळ कोणत्याही नोंदी, माहिती मागवू शकते किंवा कोणतेही प्राधिकरण / आस्थापना / व्यक्ती / पोलीस / न्यायालयाशी संबंधित अधिकारी किंवा तज्ज्ञांची मदत घेऊ शकते.

(5) नुकसान भरपाईचे वितरण झाल्यानंतर जर जिल्हा मंडळाच्या निदर्शनास आले की, चौकशीदरम्यान त्यांना दिली गेलेली माहिती चुकीची होती, तर लाभार्थीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर भरपाईच्या रकमेची अंशतः किंवा पूर्ण वसुली करणयाची कार्यवाही प्राधिकरण सुरू करू शकते.

**14. आदेशाची प्रत रेकॉर्डला ठेवणे**
या योजनेअंतर्गत जारी झालेल्या नुकसानभरपाईच्या आदेशाची प्रत माहितीसाठी ट्रायल कोर्टाच्या (सुनावणी करणारे न्यायालय) रेकॉर्डला ठेवली जाईल. नुकसान भरपाईच्या आदेशाची प्रत संबंधित न्यायालयाकडे जिल्हा मंडळाचे सचिव पाठवतील.

**15.** ही मार्गदर्शक तत्वे आणि मनोधैर्य योजनेतील तरतुदी या दोन्हींदरम्यान संभ्रम निर्माण झाल्यास मनोधैर्य योजनेतील तरतुदीच अंतिम असतील.

**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण**

## परिशिष्ट - I
## मनोधैर्य योजना, 2017 अंतर्गत अंतरिम / अंतिम नुकसान भरपाई मिळविण्यासाठी अर्ज

1. पीडितेचे / पीडितांचे किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे नाव

2. पीडितेचे / पीडितांचे किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे वय

3. (a) वडिलांचे नाव
   (b) आईचे नाव
   (c) जोडीदाराचे (पती/पत्नी) नाव

4. पीडितेचा / पीडितांचा किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचा पत्ता

5. घटनेची तारीख आणि वेळ

6. FIR दाखल करण्यात आला आहे का? असल्यास FIR ची प्रत जोडावी. नसल्यास, त्याबाबत काय झाले आहे ती माहिती द्यावी.

7. वैद्यकीय तपासणी झाली आहे का? असल्यास वैद्यकीय अहवाल / मृत्यू प्रमाणपत्र / शवविच्छेदन अहवाल अर्जासोबत जोडा.

8. न्यायालयीन सुनावणी प्रलंबित असल्यास त्याबाबतची स्थिती. पूर्ण झाली असल्यास, निकाल आणि शिक्षेबाबत आदेशाची प्रत अर्जासोबत जोडा.

9. अर्जदाराला न्यायालयाने किंवा कोणत्याही सरकारी विभागाने काही नुकसान भरपाई दिली आहे का? दिली असल्यास त्याबद्दलचा तपशील द्या.

10. झालेले नुकसान / आर्थिक खर्चाचा तपशील द्या.

11. तुम्ही गुन्हा करणाऱ्याविरुद्ध कोणताही दिवाणी खटला / दावा दाखल केला आहे का? केला असल्यास त्याबद्दलचा तपशील द्या.

**पीडित / अवलंबित / पालक यांची स्वाक्षरी**

## परिशिष्ट – II

## हमीपत्र

## 'मनोधैर्य योजना 2017' अंतर्गत भरपाईची रक्कम स्वीकारण्याआधी पीडित किंवा त्यांच्यावरील अवलंबितांनी जिल्हा मंडळासमोर लिहून द्यावयाचे हमीपत्र:

(जे लागू नसेल ते खोडा)
मी / आम्ही … … … … … (पीडित व्यक्तीचे किंवा त्यांच्यावरील अवलंबितांचे नाव)
… … … … … … … चा मुलगा / ची मुलगी / ची पत्नी / चा नातेवाईक
याद्वारे लिहून देतो की,

मी / आम्ही संपूर्ण 'मनोधैर्य पीडित नुकसान भरपाई योजना 2015' वाचली आहे आणि ती पूर्णपणे समजून घेतल्यानंतर मी / आम्ही हे हमीपत्र भरून देत आहोत.

मी / आम्ही पूर्णपणे हमी देतो की, नंतरच्या टप्प्यावर न्यायालयाने मला / आम्हाला फौजदारी दंड संहितेच्या कलम 357 अन्वये नुकसान भरपाई देण्याचा निकाल दिल्यास, मी त्याबद्दलची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला त्वरित कळवेन.

मी / आम्ही हमी देतो की मला / आम्हाला फौजदारी दंड संहिता 357 अंतर्गत जाहीर झालेली भरपाईची रक्कम, दोषी व्यक्तीद्वारे मला / आम्हाला मिळाल्यास, मी / आम्ही या प्राधिकरणाकडून मला / आम्हाला मिळालेली भरपाईची रक्कम परत करू.

मी / आम्ही ही देखील हमी देतो की, न्यायालयाच्या आदेशानुसार जर दोषी व्यक्तीने मला / आम्हाला दिलेली भरपाईची रक्कम या योजनेंतर्गत मिळालेल्या भरपाईपेक्षा कमी असेल, तर प्राधिकरणाकडून मिळालेल्या नुकसानभरपाईपैकी तेवढी रक्कम

मी / आम्ही परत करू.

मला / आम्हाला याची जाणीव आहे की, माझ्या / आमच्या नुकसानीची, दुखापतीची किंवा पुनर्वसनाची भरपाई करणे हे दोषी व्यक्तीचे प्रथम कर्तव्य आहे, आणि दोषीकडून नुकसानभरपाई मिळाल्यावर मला / आम्हाला या योजनेंतर्गत प्राधिकरणाकडून मिळालेली भरपाई परत करावी लागेल.

मला मिळालेली रक्कम जर भविष्यात परत करावी लागणार असेल, तर प्राधिकरणाने योजनेअंतर्गत भरपाईचे वितरण करताना उघडलेल्या माझ्या बँक खात्यातून / FDR मधून ती परस्पर प्राप्त करण्यास माझा काही आक्षेप असणार नाही.

मी / आम्ही अर्जात दिलेली माहिती माझ्या / आमच्या माहितीनुसार आणि विश्वासानुसार खरी आहे.

**दिनांक: ….** **अर्जदार / पीडित / अवलंबित यांची स्वाक्षरी**

# परिशिष्ट II

**मनोधैर्य योजना 2017 अंतर्गत अंतरिम / अंतिम भरपाईसाठी अर्ज**

**टीप:** मनोधैर्य योजनेअंतर्गत नुकसान भरपाईसाठी अर्ज करण्याकरिता हा नमुना (मसुदा) आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | पीडितेचे / पीडितांचे किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे नाव | |
| 2 | पीडितेचे / पीडितांचे किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे वय | |
| 3 | (a) वडिलांचे नाव | |
| | (b) आईचे नाव | |
| | (c) जोडीदाराचे (पती/पत्नी) नाव | |
| 4 | पीडितेचा / पीडितांचा किंवा त्याच्या / तिच्या / त्यांच्यावरील अवलंबितांचा पत्ता | |
| 5 | घटनेची तारीख आणि वेळ | |
| 6 | संबंधित पोलिस ठाण्याचे नाव | |
| 7 | FIR दाखल झाला आहे का? असल्यास FIR ची प्रत जोडावी. नसल्यास त्याबाबत काय झाले आहे ती माहिती द्यावी. | (ज्ञात / उपलब्ध असल्यास) |
| 8 | वैद्यकीय तपासणी झाली आहे का? असल्यास वैद्यकीय अहवाल / मृत्यू प्रमाणपत्र / शवविच्छेदन अहवाल अर्जासोबत जोडा. | |
| 9 | न्यायालयीन सुनावणी प्रलंबित असल्यास त्याबाबतची स्थिती. पूर्ण झाली असल्यास निकाल आणि शिक्षेबाबत आदेशाची प्रत अर्जासोबत जोडा. | (ज्ञात / उपलब्ध असल्यास) |
| 10 | अर्जदाराला न्यायालयाने किंवा कोणत्याही सरकारी विभागाने काही नुकसान भरपाई दिली आहे का? दिली असल्यास त्याबद्दलचा तपशील द्या. | |
| 11 | झालेले नुकसान / आर्थिक खर्चाचा तपशील द्या. | |
| 12 | तुम्ही गुन्हा करणाऱ्याविरुद्ध कोणताही दिवाणी खटला / दावा दाखल केला आहे का? केला असल्यास त्याबद्दलचा तपशील द्या. | |

**पीडित / अवलंबित / पालक यांची स्वाक्षरी**

**टीप:** पीडितेला मदत करणे आणि पिडीत व्यक्तीकडे उपलब्ध नसलेली आवश्यक माहिती मागवून घेणे ही नजीकच्या DLSA ची जबाबदारी आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या DLSA सचिवांची सर्वसमावेशक यादी या पुस्तिकेच्या **परिशिष्ट III मध्ये** दिलेली आहे.

# परिशिष्ट III

## सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण महाराष्ट्र, यांची जिल्हानिहाय नावे

| अनु क्रम | जिल्हा | कार्यालयाचा दूरध्वनी | सचिवांचे नाव | कार्यालयाचा मोबाईल क्रमांक | ईमेल आयडी या क्रमाने |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 0241-2351110 | श्रीमती भाग्यश्री के. पाटील | 8591903616 | dlsanagar@gmail.com |
| 2 | अकोला | 0724-2410145 | श्री. योगेश एस. पैठणकर | 8591903930 | akoladlsa@gmail.com |
| 3 | अमरावती | 0721-2667175 | श्री. गुलाब आर. पाटील | 8591903627 | dlsaamt@gmail.com |
| 4 | औरंगाबाद | 0240-2363778 | श्रीमती वैशाली पी. फडणीस | 8591903620 | dlsa.aurangabad@gmail.com |
| 5 | बीड | 02442-228764 | श्री. सिद्धार्थ एन. गोडबोले | 8591903623 | dlsabeed@gmail.com |
| 6 | भंडारा | 07184-256466<br>07184-256080 | श्री. बिजू बी. गवारे | 8591903936 | dlsabhandara@gmail.com |
| 7 | बुलडाणा | 07262-244673 | श्री. धनंजय बी. हंबीरे | 8591903628 | buldistlsa@gmail.com |
| 8 | चंद्रपूर | 07172-271679 | श्री. सुमित व्ही. जोशी | 8591903934 | distlegalcha@gmail.com |
| 9 | धुळे | 02562-237436 | श्री. संदीप व्ही. स्वामी | 8591903618 | dlsadhule@rediffmail.com |
| 10 | गडचिरोली | 07132-223044 | श्री. राजेंद्र आर. पाटील | 8591903933 | dlsagad@gmail.com |
| 11 | गोंदिया | 07182-238234 | श्री. सकलेश व्ही. पिंपळे | 8591903935 | dlsagondia@gmail.com |
| 12 | जळगाव | 0257-2221474 | श्री. आरीफ अब्दुल कादर शेख | 8591903619 | jalgaondlsa@yahoo.com |
| 13 | जालना | 02482-223625 | श्रीमती प्रणिता पी. वाघ | 8591903621 | dlsajalna@yahoo.com |
| 14 | कोल्हापूर | 0231-2541295<br>2546974 | श्री. प्रीतमकुमार एम. पाटील | 8591903609 | dlsa.dc.klp@gmail.com |
| 15 | लातूर | 02382-251660 | श्रीमती स्वाती डी. अवसेकर | 8591903624 | mah-latdlsa@bhc.gov.in |
| 16 | नागपूर | 0712-2541062 | श्री. जयदीप जी. पांडे | 8591903931 | dlsanagpur@rediffmail.com |
| 17 | नांदेड | 02462-246667 | श्रीमती दलजीतकौर मणिपालसिंग जज | 8591903626 | legalaidnanded@gmail.com |
| 18 | नंदुरबार | 02564-210710 | श्री. ज्ञानेश्वर व्ही. हरणे | 8591903939 | dlsa.nandurbar@rediffmail.com |
| 19 | नाशिक | 0253-2314306 | श्री. शिवाजी डी. इंदलकर | 8591903615 | dlsa-nashik@bhc.gov.in |
| 20 | उस्मानाबाद | 02472-225424 | श्री. वसंत एस. यादव | 8591903625 | dlsaosd@gmail.com |
| 21 | परभणी | 02452-229740 | श्री. संतोष जी. लांडगे | 8591903622 | dlsaparbhani@gmail.com |
| 22 | पुणे | 020-25534881 | श्रीमती मंगल डी. कश्यप | 8591903612 | dlsapune2@gmail.com |
| 23 | रायगड | 02141-223010 | श्री. अमोल व्ही. शिंदे | 8591903606 | dlsaalibag@gmail.com; |
| 24 | रत्नागिरी | 02352-224768 | श्री. अमित एन. कुलकर्णी | 8591903608 | mahratdlsa@bhc.gov.in |
| 25 | सांगली | 0233-2600928 | श्री. प्रवीण के. नरडेले | 8591903610 | sanglidlsa@gmail.com |
| 26 | सातारा | 02162-298784 | श्रीमती तृप्ती एन. जाधव | 8591903611 | supdtdlsa.satdc-mh@gov.in |
| 27 | सोलापूर | 0217-2620292 | श्री. नरेंद्र एन. जोशी | 8591903613 | mah-soldlsa@bhc.gov.in |
| 28 | सिंधुदुर्ग | 02362-228414 | श्री. दीपक बी. म्हालटकर | 8591903607 | dlsasindhudurg1@gmail.com |
| 29 | ठाणे | 022-25476441 | श्री. ईश्वर के. सूर्यवंशी | 8591903604 | legalaidthane@yahoo.com |
| 30 | वर्धा | 07152-245594 | श्री. विवेक डी. देशमुख | 8591903932 | dlsawardha@gmail.com |
| 31 | वाशिम | 07252-231455 | श्री. विजयकुमार ए. टेकवाणी | 8591903937 | dlsawashim@gmail.com |
| 32 | यवतमाळ | 07232-239741 | श्री. कुणाल ए. नहार | 8591903629 | ytldlsa@bhc.gov.in |
| 33 | मुंबई DLSA | 022-26402175 | श्री. अनंत देशमुख | 8591903601 | dlsamumbai@yahoo.in |
| 34 | मुंबई Sub.DLSA | 022-26401240 | श्री. सतीश बी. हिवाळे | 8591903602 | mumbaisuburban99@gmail.com |
| 35 | HCLSC, मुंबई | 022-22630714 | श्री. राजेश डी. पाटील | 8591903603 | hclsc.mumbai@gmail.com |
| 36 | HCLSSC, औरंगाबाद | 0240-2473733 | श्री. मकरंद आर. मांडवगडे | 8591903617 | hclsscabd@gmail.com |
| 37 | HCLSSC, नागपूर | 0712-2555555 | श्री. अनिलकुमार शर्मा | 8591903938 | hcnag.legalservices@gmail.com |

SF9, G Block, Adjacent to American School of Bombay,
Bandra - Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400098

www.viplafoundation.org